14 वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३७ ■ मंगळवार, दि.१६ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## आर्थिक दिवाळखोरी पूर्वी अनेकांनी काढले लाखो रुपये...!

### गजानन नागरीतील घोटाळ्यानंतर अकोलेकर सतर्क !




प्रतिनिधी १६ जून

**अकोला:** गजानन नागरी पतसंस्थेत झालेल्या कोट्यवधींच्या घोटाळ्यानंतर संपूर्ण अकोला जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या धक्क्यातून सावरत अकोलेकर आता कमालीचे सजग झाले असून, पतसंस्था आणि सहकारी बँकांमधून आपल्या ठेवी काढून घेण्याचा सपाटा नागरिकांनी लावला आहे. या लाखोंच्या ठेवी या राष्ट्रीय कृत सरकारी बँकांमध्ये ठेवणे सुरु झाले आहे. इतकेच नाही तर सामान्य गुंतवणूकदारांबरोबरच आता अनेक संस्थांचे संचालकही स्वतःचे पैसे अशा पतसंस्था आणि सहकारी बँकांमधून काढून घेत आहे.

कष्टाने कमाई केलेल्या पैशांवर भविष्यातील अनेक गोष्टींचे संकल्प प्रत्येकाचा असतो. बँक अथवा पतसंस्था बुडाल्यानंतर हातात काहीच मिळत नसल्याचा अनुभव पाहता गुंतवणूकदार अधिक सजग झाला आहे. गजानन नागरी पतसंस्थेच्या कोट्यावधीच्या घोटाळ्याने अकोलेकरांना दिलेला धडा हाच आहे की, 'आर्थिक बाबतीत आंधळा विश्वास घातक ठरतो.' सावध राहा, आपल्या पैशांचा हिशोब मागा आणि केवळ व्याजाच्या मोहापायी कष्टाची पुंजी धोक्यात घालू नका. तुमची सतर्कताच तुम्हाला आर्थिक घोटाळ्यांपासून वाचवू शकते.

#### सहकारी बँक असेल तर

रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, सर्व शेड्युल्ड आणि सहकारी बँकांमधील ठेवींना 'बँक ठेव विमा आणि कर्ज हमी महामंडळ' कडून ५ लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण असते. असे प्रमाणपत्र सहकारी बँकेकडे आहे काय याची खात्री गुंतवणुकदार, ठेवीदारांनी करण्याची गरज आहे. म्हणजेच, जर सहकारी बँक बुडाली तरी ग्राहकाला ५ लाख रुपयांपर्यंतची रक्कम हमखास परत मिळते. एकाच सहकारी बँकेत एका नावावर ४ ते ५ लाखांपेक्षा जास्त रक्कम ठेवू नये. जर रक्कम मोठी असेल, तर ती कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या नावावर किंवा वेगवेगळ्या राष्ट्रीय कृत बँकांमध्ये विभागून ही रक्कम ठेवावी.

#### पतसंस्था असेल तर काय ?

पतसंस्थांना कुठल्याच रक्कमेचे विमा कवच लागू नसते. त्यामुळे पतसंस्थेत गुंतवणूक करताना केवळ व्याजाचा जादा दर न पाहता संस्थेची विश्वासार्हता पाहणे गरजेचे आहे. पण, ज्या ठिकाणी तुमच्या लाखोंच्या ठेवींना विमा कवच नाही. तेथे तुम्ही अधिक जोखमी घेत गुंतवणूक करत आहात हे नक्की. पतसंस्था बुडली तर तुमच्या ठेवीचा एक पैसा पण, तुम्हाला मिळणार नाही. अनेकदा घोटाळा करणाऱ्या संस्था ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी बाजारातील दरापेक्षा २ ते ४ टक्के जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवतात. 'जास्त व्याज म्हणजेच जास्त जोखीम' हे गणितात पक्के लक्षात ठेवा. बँक किंवा पतसंस्था ते व्याज कुठून देणार ? जर ते देत असलेले व्याज अवाजवी असेल, तर तुमचा मुद्दल पैसा धोक्यात येऊ शकतो. तेव्हा वेळीच सावध व्हा.

## महाराष्ट्रासह देशभरात पावसाला ब्रेक

### ▶▶तब्बल ६४ टक्के तूट ▶▶शेतकरी प्रतीक्षेत▶▶मान्सूनची यंत्रणा कमकुवत



प्रतिनिधी १६ जून

**मुंबई/नवी दिल्ली:** यंदा वेळेपूर्वी अंदमानात दाखल होऊन वेगाने वाटचाल करणाऱ्या मान्सूनला अचानक ब्रेक लागला आहे. भारताच्या बहुतांश भागासह महाराष्ट्रात मान्सूनच्या वाटचालीत अनपेक्षित खंड पडला असून, जूनच्या मध्यापर्यंत देशपातळीवर पावसाचे प्रमाण तब्बल ६४ टक्के कमी झाले आहे. तर महाराष्ट्रात ही तूट ६९ टक्क्यांवर पोहोचली आहे.

तज्ज्ञांच्या मते, समुद्रात ओलाव्याची कमतरता नाही. मात्र, वातावरणाच्या वरच्या स्तरांतील वाऱ्यांमध्ये झालेल्या बदलांमुळे मान्सूनची यंत्रणा कमकुवत झाली आहे. यामुळे ढग तयार होण्याची प्रक्रिया मंदावली आहे. परिणामी मान्सून देशात दाखल झाला असला, तरी अपेक्षित पाऊस पडत नाही.

## सेन्सेक्स ३००, तर निफ्टी ८० अंकांनी वधारला!

**नवी दिल्ली :** शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी तेजीचे वातावरण कायम असून, गुंतवणूकदारांचा सकारात्मक कल स्पष्टपणे दिसून येत आहे. जागतिक बाजारांकडून मिळालेले मिश्र संकेत आणि देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून सुरू असलेल्या खरेदीच्या जोरावर दलाल स्ट्रीटवर आजही हिरवाईचे चित्र पाहायला मिळाले. मंगळवारी सकाळच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेंसेक्स ३००.३५ अंकांच्या शानदार वाढीसह ७६,५५४.६८ च्या पातळीवर व्यवहार करत आहे.

## शरद पवार यांच्या कुस्तिगीर परिषदेला दणका!



प्रतिनिधी १६ जून

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखालील महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषदेची भारतीय कुस्ती महासंघाने केलेली संलग्नता रद्द करण्याची कारवाई मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी कायम ठेवली. न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने परिषदेने दाखल केलेले अपील फेटाळले. भारतीय कुस्ती महासंघाने १ जानेवारी २०२३ रोजी परिषदेची मान्यता रद्द करून तिच्या जागी महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाला मान्यता दिली. याविरोधात परिषदेने उच्च न्यायालयात दाद मागितली होती.

## पहिल्या प्रयत्नातच 26 जणांना 100 पर्सेंटाईल!

### 'एमएचटी-सीईटी पीसीएम गटाचा निकाल जाहीर



प्रतिनिधी १६ जून

**मुंबई :** अभियांत्रिकी प्रवेशाच्या शर्यतीत यंदा विद्यार्थ्यांना मिळालेल्या दुहेरी संधीचा परिणाम आता निकालातूनही दिसून येत आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी) अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी शिक्षण अभ्यासक्रमांसाठीच्या पीसीएम गटाच्या पहिल्या सीईटीचा निकाल रविवारी जाहीर केला. या परीक्षेत तब्बल २६ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाइल मिळवत सर्वोच्च स्थान पटकावले आहे. दरम्यान, यंदापासून प्रथमच दोन वेळा परीक्षा घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे लक्ष आता दुसऱ्या संधीच्या निकालाकडे लागले आहे. दोन्ही परीक्षांमधील सर्वोच्च पर्सेंटाइलच प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे.

राज्यातील व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेत सीईटीला विशेष महत्त्व असते. यंदा पीसीएम गटाच्या पहिल्या परीक्षेसाठी ४ लाख ७९ हजार ३३२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४ लाख ५४ हजार ६९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली.

#### चार विद्यार्थिनींना १०० पर्सेंटाइल

निकालात १०० पर्सेंटाइल मिळविणाऱ्या २६ मध्ये २२ विद्यार्थी आणि चार विद्यार्थिनींचा समावेश आहे. यापैकी २४ विद्यार्थी महाराष्ट्रातील असून, दोन विद्यार्थी अन्य राज्यांतील आहेत. पुणे, नागपूर, मुंबई, ठाणे, चंद्रपूर, गोंदिया, लातूर, सोलापूर आणि यवतमाळसारख्या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सर्वोच्च पर्सेंटाइल मिळवत आपली छाप पाडली.

#### दुसऱ्या संधीच्या निकालाकडे लक्ष

दुसऱ्या संधीच्या सीईटीचे निकाल अद्याप जाहीर व्हायचे आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता क्रमवारीत बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः पहिल्या प्रयत्नात अपेक्षित कामगिरी न करणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या परीक्षेतील गुणांचा मोठा फायदा होऊ शकतो. परिणामी, अंतिम गुणवत्ता यादी आणि प्रवेश प्रक्रियेचे चित्र दुसऱ्या निकालानंतर अधिक स्पष्ट होणार आहे.

## 'नीट' परीक्षेपूर्वीच टेलिग्रामवर तात्पुरती बंदी!

### मोठा निर्णय ; पेपर लीकच्या अफवांना आळा घालण्यासाठी केंद्राची कारवाई




प्रतिनिधी १६ जून

**नवी दिल्ली :** नीट २०२६ पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. परीक्षा प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम ठेवण्यासाठी सरकारने २२ जूनपर्यंत टेलिग्राम प्लॅटफॉर्मवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. याशिवाय, ३० जूनपर्यंत टेलिग्रामवरील मेसेज एडिट करण्याच्या सुविधेवरही मर्यादा आणण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने या निर्णयाचे स्वागत केले असून, गेल्या काही काळात टेलिग्रामचा वापर करून काही टोळ्या नीट उमेदवारांची दिशाभूल करत असल्याचा दावा केला आहे. पेपर लीक झाल्याचे खोटे दावे, बनावट प्रश्नपत्रिका आणि पुनर्परीक्षेबाबत चुकीची माहिती पसरवून विद्यार्थ्यांकडून हजारो ते लाखो रुपये उकळले जात असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. दरम्यान, २१ जून २०२६ रोजी होणारी नीट पुनर्परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच पार पडणार असल्याचे एनटीएने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावरील अफवा किंवा अप्रमाणित माहितीकडे दुर्लक्ष करून केवळ अधिकृत सूचनांवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

#### विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या चॅनेल्सवर कारवाई

इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरने एनटीए आणि विविध राज्यांच्या पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार अनेक टेलिग्राम चॅनेल्स, ग्रुप्स आणि बॉट्सविरोधात कारवाई केली आहे. मात्र, स्वतंत्रपणे चॅनेल्स बंद करूनही गैरप्रकार पूर्णपणे थांबत नसल्याचे लक्षात आल्यानंतर प्लॅटफॉर्म स्तरावर निर्बंध घालण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजते.

#### एडिट फीचरमुळे तयार होत होते दिशाभूल करणारे पुरावे

एनटीएच्या म्हणण्यानुसार, टेलिग्राममधील एडिट फीचरचा गैरवापर होत होता. काही अ‍ॅडमिन जुन्या फाईल्स बदलून त्याजागी नवीन फाईल्स अपलोड करत होते. मात्र, मूळ टाइमस्टॅम्प कायम राहत असल्याने परीक्षा झाल्यानंतरही 'प्रश्नपत्रिका आधीच उपलब्ध होती' असा भास निर्माण केला जात होता. यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण तयार होत होते.

#### विद्यार्थ्यांना एनटीएचे आवाहन

या निर्बंधांचा परिणाम काही प्रमाणात सर्वसामान्य वापरकर्त्यांवरही होणार असल्याची कबुली एनटीएने दिली आहे. मात्र, हा निर्णय केवळ परीक्षेच्या संवेदनशील कालावधीपुरता असून परीक्षेची निष्पक्षता जपणे हेच त्यामागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.

#### लाखोंची मागणी

तपासादरम्यान 'पेपर लीक', 'नीट री-एग्जाम २०२६' अशा नावांची अनेक चॅनेल्स आढळून आली. या माध्यमांतून विद्यार्थ्यांना कथित प्रश्नपत्रिका किंवा विशेष माहिती देण्याचे आमिष दाखवून मोठ्या रकमा मागितल्या जात असल्याचा आरोप आहे.

## गुटखा माफिया सुट्टीवर; शौकिनांचे खिसे रिकामे

### मुंढे मकोका पॅटर्नचा धसका !एफडीए आयुक्त तुकाराम मुंढेंची धडक कारवाई



प्रतिनिधी १६ जून

**अकोला:** प्रशासकीय वर्तुळात आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी प्रसिद्ध असलेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाची धुरा सांभाळताच राज्यात पुन्हा एकदा 'मुंढे पॅटर्न'चा धसका पाहायला मिळत आहे. त्यांच्या धडक आणि तडकाफडकी कारवाईच्या धसक्यामुळे राज्यातील गुटखा माफियांचे धाबे दणाणले असून, वर्षानुवर्षे छुप्या पद्धतीने चालणारी गुटख्याची अवैध विक्री संपूर्णपणे ठप्प झाली आहे. अकोल्यातील गुटखा माफिया सुट्टीवर गेले असून मात्र यात गुटखा शौकिनांचे मात्र खिसे रिकामे होताना दिसत आहे.

तुकाराम मुंढे यांच्या नावाचा खौफ एवढा आहे की, कारवाईच्या भीतीने राज्यातील मोठे गुटखा किंग आणि माफिया सध्या 'सुट्टीवर' गेले आहेत. कोणत्याही क्षणी पडणाऱ्या छाप्यांच्या भीतीमुळे होलसेलर व्यापाऱ्यांनी गुटख्याचा साठा गोदामांमध्येच दडवून ठेवला असून, तो विकण्यास स्पष्ट नकार दिला आहे. परिणामी, बाजारात गुटख्याचा प्रचंड तुटवडा (शॉर्टेज) निर्माण झाला आहे. गुटखा माफियांना मकोकाची भिती असून आपल्यावर जर मकोका दाखल झाला तर मग अडकलो हीच भिती गुटखा माफियांना खात आहे. त्यामुळे तुर्तास धंदे बंद करा, आराम करा, गावाबाहेर जा या भूमिकेत गुटखा माफिया आहेत.

#### पानटपरी चालकही धास्तावले

नेहमी छुप्या मार्गाने गुटखा विकणारे किरकोळ पान ठेला चालक आता पुरते हादरले आहेत. 'साहेबांची नजर पडली तर थेट दुकान सील होणार आणि जेल होणार,' या भीतीने पानटपरी चालकांनी होलसेलरकडून गुटखा घेण्यास साफ नकार दिला आहे. अनेक पानठेल्यांवरून गुटखा गायब झाला असून, केवळ अधिकृत पानमसालाच विकला जात आहे. या संपूर्ण परिस्थितीचा सर्वात मोठा फटका मात्र गुटखा शौकिनांना बसला आहे. बाजारात गुटखा मिळेनासा झाल्याने आणि तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने काळ्या बाजारात गुटख्याचे दर गगनाला भिडले आहेत. गुटख्याची अनपेक्षित दरवाढ थेट शौकिनांच्या बोकांडी बसली असून, खिसे रिकामे होत असल्याने गुटखाप्रेमी प्रचंड अडचणीत सापडले आहेत.

#### अधिकारीही अघोषित सुट्टीवर !

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केवळ माफियांमध्येच नाही तर स्वतः एफडीए विभागाच्या अंतर्गत अधिकाऱ्यांमध्येही आयुक्त मुंढेंची कमालीची दहशत आहे. 'कामचुकारपणा किंवा भ्रष्टाचाराची गय केली जाणार नाही,' या मुंढेंच्या भूमिकेमुळे आणि संभाव्य अंतर्गत कारवाईच्या भीतीपोटी अनेक संशयास्पद अधिकाऱ्यांनी अचानक 'अघोषित सुट्या' घेण्यावर भर दिला आहे. तर काहींनी पैसे कमवून पुण्यात बदलीची तयारी सुरु केली आहे. तर काहींच्या बदल्या झाल्या आहेत.

## कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन फेटाळला!

**छत्रपती संभाजीनगर :** शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारी प्रकरणातील आरोपी कल्पना अशोक खरातला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दणका दिला आहे. कल्पना खरातने अटकेपासून वाचण्यासाठी न्यायालयात दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने तपासातील गंभीर पुरावे पाहता फेटाळून लावला आहे. या प्रकरणात आता तिची पोलीस कोठडीत चौकशी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.




CMYK CMYK


सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
मंगळवार दि. १६ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## कच्चा कांदा खाणं चांगलं की वाईट?

भारतीय जेवणात कच्चा कांदा हा केवळ चव वाढवणारा पदार्थ नसून आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर मानला जातो. कच्च्या कांद्यामध्ये क्वेर्सेटिन, सल्फर संयुगे, व्हिटॅमिन सी आणि प्रिबायोटिक फायबर्स मुबलक प्रमाणात असतात, जे हृदयाचे आरोग्य सुधारण्यास, पचनक्रिया मजबूत करण्यास आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढवून शरीराला संसर्गांपासून संरक्षण देण्याचे कामही कांदा करतो. मात्र, चुकीच्या पद्धतीने किंवा अतिप्रमाणात कांदा खाल्ल्यास ॲसिडिटी आणि पोटदुखीचा त्रास होऊ शकतो.



# पालकांसाठी गुडन्यूज : गुगलने मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणले नवीन पॅरेंटल कंट्रोल फीचर्स



गुगलने मुलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी एक मोठा आणि महत्त्वाचा अपडेट जारी केला आहे. या अंतर्गत पालकांना आता आपल्या मुलांच्या गुगल अकाउंटवर अधिक नियंत्रण मिळवता येणार आहे. पालक आता मुलांची सर्च हिस्ट्री आणि यूट्यूब ॲक्टिव्हिटी सहज ट्रॅक करू शकतील, ज्यामुळे मुले इंटरनेटवर नेमके काय पाहत आहेत, यावर बारीक लक्ष ठेवता येईल.

तुमच्या मुलाचे गुगल अकाउंट असेल, तर कंपनीने जारी केलेल्या नवीन पॅरेंटल कंट्रोल सेटिंग्ज त्वरित तपासा. या नवीन अपडेटमुळे पालकांना मुलांचे पर्सनलाइज्ड रेकमेंडेशन्स आणि ऑटो-डिलीट पर्याय अधिक चांगल्या प्रकारे मॅनेज करता येतील. मुलांच्या सुरक्षित ऑनलाईन प्रवासासाठी आणि सायबर धोक्यांपासून त्यांचा बचाव करण्यासाठी हे फीचर्स अत्यंत उपयुक्त ठरतील.

मुलांची ऑनलाइन सुरक्षा आणखी मजबूत करण्यासाठी गुगलने नुकतेच एक महत्त्वाचे अपडेट जारी केले आहे. आता पालकांना त्यांच्या मुलाच्या गुगल सर्च हिस्ट्रीवर आणि पर्सनलाइज्ड शिफारसींवर अधिक चांगले नियंत्रण मिळाले आहे. गुगलने पाठवलेल्या ईमेलमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, कंपनी सेटिंग्ज अपडेट करत आहे जेणेकरून पालक आणि मुले दोघांचीही सेव्ह केलेली हिस्ट्री आणि वैयक्तिक शिफारसींवर अधिक नियंत्रण असेल.

### नवीन फीचर्स काय आहेत?

१. सर्च हिस्ट्रीवर अधिक चांगले नियंत्रण
आता आपल्या मुलाचा सर्च हिस्ट्री किती काळ सेव्ह केली जाईल हे आपण सहजपणे ठरवू शकता. ऑटो डिलिटचा पर्यायही उपलब्ध आहे.
२.पर्सनलाईज्ड रिकमेंडेशन
गुगल आता मुलांना कमी अयोग्य किंवा अनावश्यक सूचना दाखवणार आहे. पालक देखील या शिफारसी मर्यादित किंवा पूर्णपणे बंद करू शकतात.
३.ऑटो-डिलीट सेटिंग्ज- सर्च हिस्ट्री, यूट्यूब हिस्ट्री इ. आपोआप किती दिवसांनी डिलीट होतील हे तुम्ही निवडू शकता.
४.मीडिया सेव्हिंग कंट्रोल.- मूल कोणते फोटो, व्हिडिओ किंवा मीडिया सेव्ह करू शकते याकडेही पालक लक्ष ठेवतील.

### नवीन सेटिंग्ज कशा तपासाव्या?


आपल्या गुगल खात्यावर peedve Data& Privacyed विभागावर peejd dve eWb Apped Activityed किंवा ण्प्र्टे म्दल्हू एूहे मध्ये नवीन फीचर्स दिसतील. युजर्सची, विशेषतः मुलांची प्रायव्हसी लक्षात घेऊन गुगल वेळोवेळी नवीन फीचर्स आणत असते. हे अद्यतन सर्व पालकांसाठी खूप उपयुक्त आहे ज्यांना आपल्या मुलांच्या ऑनलाइन क्रियाकलापांवर लक्ष ठेवायचे आहे. जर तुमच्या मुलाचे गुगल अकाउंट असेल तर हा ईमेल ताबडतोब चेक करा आणि तुमच्या गरजेनुसार नवीन प्रायव्हसी सेटिंग्ज लागू करा. हे मुलांना सुरक्षित आणि अचूक सामग्रीचा आनंद घेण्यास अनुमती देईल.

### हे अपडेट का आवश्यक आहे?

आजकालची मुले अगदी लहान वयातच स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वापर करू लागतात. अशा परिस्थितीत त्यांची सर्च हिस्ट्री, पाहिलेले व्हिडिओ आणि सुचविलेल्या कंटेंटवर लक्ष ठेवणे आवश्यक झाले आहे. गुगलच्या या नवीन अपडेटमुळे पालकांना थोडा दिलासा मिळेल आणि मुलांची डिजिटल सुरक्षा मजबूत होईल.

## दिन विशेष

### सुप्रसिद्ध भारतीय गायक, संगीतकार व निर्माता : हेमंत कुमार



हेमंतदा यांची आज जयंती

हेमंत मुखोपाध्याय हे एक सुप्रसिद्ध भारतीय गायक, संगीतकार व निर्माता होते. हिंदी क्षेत्रात ते हेमंत कुमार (हेमंतदा) आणि हेमंत मुखर्जी या नावांनी प्रसिद्ध होते. हेमंतदांचा जन्म १६ जून १९२० ह्या दिवशी वाराणसी येथे झाला. त्यांचे बालपण बंगालमधील एका खेड्यात गेले. त्याकाळी खेड्यात होत असलेली नाटके पहात आणि लोकसंगीत ऐकत हेमंतदा मोठे झाले, पण संगीताचे औपचारिक शिक्षण हेमंतदांना मिळाले नाही. त्यांचा कुटुंबीयांचा संगीतक्षेत्राशी काहीही संबंध नव्हता. कोलकाता येथील महाविद्यालयात शिकताना १९३५ साली त्यांनी आकाशवाणीवर गाण्याची चाचणी परीक्षा दिली आणि गायक म्हणून ते आकाशवाणीवर गायला पात्र झाले.

गायनात गती असणाऱ्या हेमंतदांना साहित्यक्षेत्रातदेखिल रस होता. १९३७ साली त्यांनी लिहिलेली एक लघुकथा आणि गायलेले एक गाणे ह्या दोन्ही गोष्टी प्रसिद्ध झाल्या आणि हेमंतदांमधील कलाकार जन्मास आला. वर्षभर विद्युत अभियांत्रिकी शिकल्यावर त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला आणि पूर्णवेळ संगीतकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. १९४० साली 'निमोई संन्यासी' ह्या बंगाली चित्रपटासाठी तर १९४४ साठी 'ईरादा' ह्या हिंदी चित्रपटांसाठी गाणी गाऊन हेमंतदांचा चित्रपटातील पार्श्वगायकाच्या कारकिर्दीस सुरुवात केली. पैकी बंगाली चित्रपटासाठी संगीतकार हरि प्रसन्नो दास ह्यांच्या हाताखाली सहाय्यक संगीत दिग्दर्शक म्हणूनही हेमंतदांनी काम केले. स्वतंत्र संगीतकार म्हणून त्यांनी १९४५ सालच्या पूर्बोरंग ह्या बंगाली तर १९५२ सालच्या आनंदमठ ह्या हिंदी चित्रपटाला संगीत दिले. १९५४ सालच्या नागिन चित्रपटासाठी संगीतदिग्दर्शित केलेले त्यांची गाणी खूप गाजली. ह्याच चित्रपटासाठी त्यांना फिल्मफेरचा सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून पुरस्कारदेखिल मिळाला. गायक म्हणून हेमंतदांनी हिंदी चित्रपटसंगीत क्षेत्रातील जवळपास सर्व आघाडीच्या संगीतकारांकडे गाणी गाईली.

निर्माता १९५९ साली हेमंतदांनी मृणाल सेन दिग्दर्शित नील आकाशेर नीचे ह्या चित्रपटाद्वारे चित्रपटनिर्मीती क्षेत्रात प्रवेश केला. त्यांच्या गीतांजली प्रॉडक्शन्स ह्या चित्रपटकंपनीने निर्माण केलेले बीस साल बाद (१९६२), कोहरा (१९६४), खामोशी (१९६९) ह्यांसारखे हिंदी चित्रपट त्यांतील गाण्यांसकट लोकप्रिय झाले. ह्या सर्व चित्रपटांसाठी संगीतदिग्दर्शनाची जबाबदारीदेखिल हेमंतदांनी यशस्वीपणे संभाळली होती. हेमंतदांनी गाईलेली मोजकी मराठी गाणी लोकप्रिय झाली. 'हा खेळ सावल्यांचा' ह्या चित्रपटातील 'गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय', लता मंगेशकर ह्यांच्याबरोबरचे 'मी डोलकर, डोलकर दर्याचा राजा' ही हेमंतदांच्या लोकप्रिय मराठी गाण्यांची काही उदाहरणे आहेत.

**१९५४ फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट संगीतकार**
१९७० निमंत्रण चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (चित्रपट निर्माता)
१९८४ ललान फकिर चित्रपटासाठी उत्कृष्ट पार्श्वगायक म्हणून राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार
संगीत नाटक अकादमी पुरस्कार
१९८५ साली रविंद्र भारती विश्वविद्यालयासाची डि. लिट. ही पदवी

# भूतान तंबाखू विक्रीवर पूर्णपणे बंदी घालणारा जगातील पहिला देश!



भूतान हा देशात तंबाखूच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालणारा जगातील पहिला देश आहे. भूतानच्या नॅशनल असेंब्लीने २००४ मध्ये सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरावर आणि विक्रीवर बंदी घातली होती. त्यानंतर १६ जून २०१० रोजी अधिकृतपणे 'तंबाखू नियंत्रण कायदा' लागू करून देशभरात तंबाखूच्या लागवडीपासून ते विक्री आणि वितरणावर पूर्ण बंदी घालण्यात आली. या कायद्यानुसार, भूतानमध्ये तंबाखूच्या विक्रीवर बंदी असली तरी, नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी परदेशातून (विशेषतः भारतातून) मर्यादित प्रमाणात तंबाखू किंवा सिगारेट आणण्याची कायदेशीर परवानगी आहे. परंतु, अशा आयातीवर १०० ते २०० टक्के इतका प्रचंड कर आकारला जातो. या कडक धोरणामुळे भारतातून होणाऱ्या सिगारेटच्या तस्करीला आणि काळाबाजाराला प्रोत्साहन मिळाल्याचेही समोर आले होते. कोविड-१९ साथीच्या आजाराच्या काळात, सीमा बंद असल्याने सिगारेटचा काळाबाजार आणि तस्करी वाढल्यामुळे, संसर्ग रोखण्याच्या उद्देशाने सरकारने ही बंदी तात्पुरती शिथिल करत २०२२/२०२३ मध्ये तंबाखूच्या विक्रीला काही अटींसह कायदेशीर मान्यता दिली होती. भूतानच्या बौद्ध संस्कृतीनुसार नशा किंवा अपायकारक पदार्थांचा त्याग करणे हे आध्यात्मिक कल्याणासाठी महत्त्वाचे मानले जाते. या भूमिकेतूनच हा निर्णय घेण्यात आला.तंबाखूवर बंदी घालणाऱ्या इतर देशांचा विचार करता, मालदीव हा असा पहिला देश आहे ज्याने विशिष्ट वर्षांनंतर जन्मलेल्या नागरिकांना आयुष्यभर तंबाखू खरेदी किंवा वापरण्यास मनाई करणारा कायदा केला आहे. भूतान धूम्रपान बंदी जगातील पहिली राष्ट्र आहे. भूतान मध्ये पगार समतुल्य दंड आहेत. भूतान तंबाखू नियंत्रण कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान किंवा तंबाखू विक्री बेकायदेशीर केले आहे.

कोरोना महामारीच्या काळात सीमा पूर्णपणे बंद होत्या. त्यामुळे भारतातून तंबाखूची गुपचूप तस्करी प्रचंड वाढली. हे रोखण्यासाठी भूतान सरकारने जुलै २०२१ मध्ये 'तंबाखू नियंत्रण (सुधारणा) कायदा २०२१' मंजूर केला. या नवीन कायद्यानुसार, भूतानमध्ये आता तंबाखू उत्पादनांची खरेदी, विक्री आणि वाहतूक कायदेशीर करण्यात आली आहे. मात्र, अजूनही देशांतर्गत तंबाखूचे उत्पादन किंवा लागवड करण्यास पूर्णपणे बंदी आहे. सध्या भूतानमध्ये तरुण पिढीमध्ये ई-सिगारेटचा वापर खूप वाढला आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी भूतानचे संसद सदस्य 'तंबाखू नियंत्रण सुधारणा कायदा २०२६' अंतर्गत नवीन नियम लागू करत आहेत. जगातील अनेक देशांनी भूतानसारखेच किंवा त्याहून वेगळे कडक नियम लागू केले आहेत. जागतिक स्तरावर तंबाखूचे सेवन कमी करण्यासाठी एक जागतिक करार आहे. भूतान या कराराचा सक्रिय भाग असून, त्यानुसारच आपल्या देशातील सार्वजनिक जागा स्मोक-फ्री ठेवण्याचा प्रयत्न करतो.

### तंबाखूवर कडक बंदी घालणारे जगातील इतर देश

मालदीव : मालदीवने 'इलेक्ट्रॉनिक सिगारेट आणि व्हेपिंग' उत्पादनांवर पूर्णपणे बंदी घातली आहे. तसेच तरुणांना तंबाखूपासून दूर ठेवण्यासाठी वयाचे कडक नियम केले आहेत.न्यूझीलंड (स्मोक-फ्री जनरेशन कायदा): न्यूझीलंडने १ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या कोणत्याही व्यक्तीला आयुष्यभर सिगारेट विकण्यावर बंदी घालणारा ऐतिहासिक कायदा केला होता. (जरी नंतर सरकार बदलल्यामुळे या कायद्यात काही राजकीय बदल झाले, तरी सिगारेटमधील निकोटीनचे प्रमाण कमी करण्याचे नियम तिथे खूप कडक आहेत.)



**सिंगापूर :** सिंगापूरमध्ये सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास अत्यंत कडक बंदी आहे. तिथे ई-सिगारेट बाळगणे, खरेदी करणे किंवा वापरणे हा गुन्हा मानला जातो आणि त्यासाठी मोठा दंड आकारला जातो.

**ऑस्ट्रेलिया :** ऑस्ट्रेलियामध्ये केवळ 'डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय' ई-सिगारेट किंवा निकोटीन व्हेप्स खरेदी करण्यावर पूर्ण बंदी आहे.



# केदारनाथची आपत्ती : एक दुःखद स्मृती

उत्तराखंडच्या केदारनाथ परिसरात झालेली ढगफुटी ही भारतातील सर्वात भीषण नैसर्गिक आपत्तींपैकी एक आहे. १६ जून २०१३ रोजी झालेल्या या महाप्रलयात मंदाकिनी नदीला पूर आला होता. यात सुमारे ६,००० लोकांचा मृत्यू झाला, तर लाखो भाविक अडकून पडले होते. केदारनाथच्या आपत्तीचे खापर कोणावर ना कोणावर फोडले जात आहे. तिथले हवामान, भूरचना-भूशास्त्र, वनस्पती आवरणातील बदल, जमीनवापरातील बदल हे लक्षात घेतल्याशिवाय त्याच्या कारणापर्यंतच पोहोचता येणार नाही. खरंतर आपण ही आपत्ती घडण्याची तयारी करूनच ठेवली होती. तिथे पडलेल्या मोठ्या पावसाने केवळ एका ठिणगीचे काम केले.

केदारनाथ परिसरात आलेला पूर, त्यामुळे झालेले जीवित-आर्थिक नुकसान यामुळे या आपत्तीची सर्वत्र चर्चा सुरू आहे. त्याची कारणमीमांसा केली जात आहे आणि कोणावर ना कोणावर खापर फोडले जात आहे. तिथे झालेली ढगफुटी, नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, हिमालयात उभे राहत असलेले विद्युत प्रकल्प-धरणे, बेसुमार जंगलतोड की ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम..? जो तो आपापल्या परीने या आपत्तीची कारणे शोधण्याचा प्रयत्न करत आहे. पण तिथले हवामान, भूरचना-भूशास्त्र, वनस्पती आवरणात झालेले बदल आणि जमीनवापराच्या पद्धतीत झालेले बदल हे लक्षात घेतल्याशिवाय नेमक्या कारणापर्यंत पोहोचता येणार नाही. भारतीय वन सेवेतील वरिष्ठ अधिकारी (निवृत्त) माधव गोगटे यांनी अलीकडेच केदारनाथ अभयारण्य व गंगोत्री राष्ट्रीय उद्यान यांची सद्यस्थिती व त्यांचे व्यवस्थापन कसे करायला हवे, यावर विस्तृत अभ्यास केला. त्यांनी सरकारसाठी तयार केलेला अहवाल, गोगटे तसेच, त्या भागात अभ्यास केलेले भूशास्त्रज्ञ व हवामानशास्त्रज्ञ यांच्याशी केलेल्या चर्चेतून या आपत्तीच्या कारणांचा नेमकेपणाने अंदाज येतो.

### आपत्तीप्रवण भूरचना

केदारनाथ व परिसराची समुद्र सपाटीपासूनची उंची आहे, साधारणतः ३५८१ मीटर. याचा समावेश होतो हिमालयाच्या शिवालिक पर्वतरांगेमध्ये. या शिवालिक पर्वतरांगा मुळातच परावलंबी. हिमालयाची निर्मिती होत असताना पर्वतांची झीज झाली. त्यातून खाली आलेले खडक-गाळ तळाशी जमा झाले. त्यांचे एकत्रीकरण झाले व हा भागच पुन्हा वर आला. त्याचेच शिवालिक पर्वतरांगा बनल्या आहेत. त्यांची निर्मिती अशी असल्याने हे डोंगर व त्यातील खडक मुळातच ठिसूळ आहेत, झीज होण्यास अनुकूल आहेत. या परिसराला आपत्तीप्रवण बनवणारी आणखी एक बाब म्हणजे हा परिसर भूकंपप्रवण आहे. त्यात इतर अनेक गोष्टींची भर पडली आहे.

### वन्यजीवांना पोहोचणारा धोका

या परिणामांबरोबरच तिथले वन आणि वन्यजीवांवरही मोठे परिणाम झाले आहेत. विशेषतः घोड्यांमुळे वन्यजीवांमध्ये संसर्ग पोहोचण्याची भीती वाढली. हेलिकॉप्टर्सच्या सततच्या फेऱ्यांमुळे वन्यजीवांच्या संख्येवर परिणाम झाला. इथे उन्हाळ्यात प्रजननासाठी स्थलांतरित पक्षी व प्राणी येत असतात. या गर्दी-गोंगाटामुळे त्यांच्यावर विपरीत परिणाम झाला नसता तरच नवल! तिथल्या अभयारण्याच्या ९७५ चौरस किलोमीटरमागे अधिकारी व कर्मचारी आहेत केवळ २५. त्यात पर्यटकांच्या झुंडीच्या झुंडी. कोण, कुठे व कोणावर नियंत्रण ठेवणार? हे परिणाम डोळ्यादेखत होत आहेत. तरीही ते रोखण्यासाठी आता एक प्रमुख अडथळा आहे तो या सर्व गोष्टींवर विकसित झालेल्या अर्थकारणाचा. गोगटे यांचा अहवाल सांगतो की, पर्यटक आणि त्यांचे सामान लादून नेणाऱ्या घोड्यांपासून तिथे एका हंगामात (तीन महिने) तब्बल ८५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते, तर हेलिकॉप्टरचा व्यवसाय आहे १२० कोटी रुपयांचा. असे 'खोऱ्याने' पैसे मिळत असताना हे सारे थांबवून पर्यावरण आणि सुरक्षेकडे लक्ष दिले जाईल का? हाही मुद्दा आता प्रमुख बनतो आहे. या सर्व गोष्टी हेच सांगतात की या वर्षी फार वेगळे असे काहीही घडलेले नाही. आपण हळूहळू हे घडण्याची तयारी करूनच ठेवली होती. दारूगोळा तयारच होता. बस्स. एक ठिणगी पडायचा अवकाश होता. मोठ्या पावसाने ते काम केले.. त्यातून उडालेला भडका आपण पाहातच आहोत!

..........

### ढगफुटी ही नियमित घटना

या परिसराच्या हवामानाबद्दल सांगायचे तर तिथे ढगफुटी होणे ही सामान्य बाब आहे. वाळवंट आणि पर्वतीय प्रदेशांमध्ये ढगफुटी वारंवार होत असते. केदारनाथ परिसरातील हवामानाचे आकडेसुद्धा याला पुष्टी देतात. तिथल्या उखीमठ तहसील कार्यालयातील नोंदी सांगतात की, तिथल्या पर्जन्याची वार्षिक सरासरी ३०९३ मिलिमीटर इतकी जास्त आहे. म्हणजे आपल्या कोकणापेक्षाही जास्त पाऊस! याशिवाय तिथे २००६ च्या जून महिन्यात तब्बल २०३५ मिलिमीटर पावसाची नोंद आहे, तर २०१० च्या ऑगस्टमध्ये १०१४ मिलिमीटरची नोंद झालेली आहे. त्यामुळे कमी काळात जास्त पाऊस पडणे (म्हणजेच ढगफुटी) हे तिथे वरचेवर घडतच असते. पर्वतीय भागात अचानक मोठा पाऊस पडणे, त्यात वस्त्या वाहून जाणे, कुठेतरी गाळ साचून किंवा कडे कोसळून पाण्याचा प्रवाह अडणे, हा नैसर्गिकरीत्या बनलेला बंधारा फुटून प्रलय होणे हेही घडत असते.. त्यामुळे या वेळी काहीतरी आगळावेगळा पाऊस पडला, असेही म्हणता येत नाही. परिणामी, या घटनेमागे ग्लोबल वॉर्मिंग असल्याची शक्यताही गळून पडते.

याच्या पलीकडे जाऊन धरणे-प्रकल्प यांच्याबद्दल बोलायचे तर हिमालयात असे प्रकल्प मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. पण त्याचा केदारनाथशी संबंध नाही. हे ठिकाणच ३५८१ मीटर म्हणजे तब्बल बारा हजार फूट उंचीवर आहे. ते वसले आहे मंदाकिनी नदीच्या किनाऱ्यावर. त्याच्या वरच्या बाजूला कोणतेही धरण नाही. त्यामुळे धरणाचा केदारनाथशी संबंध पोहोचत नाही. पण पावसामुळे नद्या, ओढे, नाल्यांचे प्रवाह एकमेकांमध्ये मिसळतात आणि पुढे रौद्र रूप धारण करतात. त्यांच्यामुळे होणाऱ्या आपत्तीसाठी धरण फुटण्याची गरज असतेच असेही नाही.

...........

### नेमकी कारणे कोणती?

मग आताच्या आपत्तीमागे कोणती कारणे म्हणायची? आपत्तीप्रवण भूरचना व अचानक येणारा प्रचंड पाऊस याच्याबरोबरच इतरही काही कारणांचा मागोवा घ्यावा लागतो. त्यासाठी माधव गोगटे यांच्या अहवालाचा आधार घ्यावा लागतो. केदारनाथ हा सुमारे ९७५ चौरस किलोमीटरच्या अभयारण्याचा भाग आहे. त्यात कस्तुरीमृग, हिमबिबट्या, काही पक्षी व प्राणी संरक्षित आहेत. इतक्या उंचावर मोठे वृक्ष नाहीत. मात्र, तिथे झुडपे आणि हंगामी गवत वाढते. आधीच खडक ठिसूळ, त्यामुळे वनस्पती आवरण अतिशय महत्त्वाचे ठरते. मात्र, आता विविध कारणांमुळे हे आवरण कमी झाले आहे. त्याचबरोबर या डोंगरउतारावर रस्ते रुंद करणे, तिथे उतारावर टपऱ्या-वस्त्या वाढल्यामुळे तिथले उतार अधिक आपत्तीप्रवण बनले आहेत. हे का घडले? याचीही गोगटे यांच्या अहवालात चर्चा करण्यात आली आहे. त्यांनी तिथे प्रचंड संख्येने येणाऱ्या पर्यटकांकडे आणि त्यांच्या एकूणच वागण्याकडे बोट दाखवले आहे.

केदारनाथ हा ज्याचा एक भाग आहे अशी चारधाम यात्रा पूर्वापार आहे. त्याला जाणाऱ्यांची संख्या पूर्वी बेताची होती. आता त्यात प्रचंड वाढ झाली आहे, इतकेच नव्हे तर त्यात आता भाविकांपेक्षा उत्सवी पर्यटकांची संख्या वाढली आहे. आकडेवारीनुसार केदारनाथ अभयारण्यातून दरवर्षी तब्बल एक लाखाहून अधिक पर्यटक जा-ये करतात. हवामानाचा विचार करता ही यात्रा फारतर तीन महिने सुरू असते. म्हणजे इतक्या कमी काळात लाखभर पर्यटक! बहुतांश पर्यटक 'लेज-कुरकुरे-पेप्सी' वाले. त्यामुळे आरामात येणे, 'मज्जा' म्हणून हा यात्रा करणे, भरपूर पैसे खर्च करणे, जास्तीत जास्त गोष्टी वापरणे हे आलेच. त्याचा थेट ताण तिथल्या नैसर्गिक साधनांवर पडतो. एकच उदाहरण द्यायचे तर आता जास्तीत जस्त लोक वर जाण्यासाठी चालण्याऐवजी घोडे वापरतात, शिवाय सामान वाहून नेण्यासाठीही त्यांचा वापर होतो. त्यामुळे एकट्या केदारनाथला तब्बल पाच हजार घोडे आहेत. या घोड्यांना खायला काय घालणार? मग त्याचा बोजा पडतो तो जंगलातील गवत, झुडपांवर. शिवाय इतक्या पर्यटकांच्या गरजा भागवायच्या (अर्थातच चांगले पैसे मिळतात म्हणून!) तर जंगलातील लाकूड लागतेच. इतकेच नव्हे तर लोकरीसाठी प्रसिद्ध असलेल्या पश्मिना सारख्या मेंढ्यांची चराईही याच गवतावर होत आली आहे. या साऱ्यांमुळे आता तिथले वनस्पती आवरण झपाट्याने घटले आहे. त्यामुळेच आधीच ठिसूळ असलेले खडक व सुटी माती आणखी मोकळी झाली. एखाद्या मोठ्या पावसात झटकन वाहून जायला अगदी सज्ज! पैसेवाले व आरायदायी पर्यटक आले म्हणजे रस्ते मोठे लागणार. नाहीतर यांच्या आलीशान गाड्या जाणार कशा? त्यांच्यासाठी लागणारे लेज, पेप्सी, बिसलेरी वरती नेण्यासाठीही रस्त्यांची गरज आहे. मग होत्या त्या वाटा रुंद झाल्या. आधीच हा ढासळणारा भाग. त्यात रस्ते रुंद केल्याने वरचा डोंगर ढासळण्यास आणखीच प्रवण बनला. त्यासाठी संरक्षक भिंती-कठडे करणे अपेक्षित होते, पण त्या जागी टपऱ्या, हॉटेल, धर्मशाळा उभ्या राहिल्या. जे डोंगर उतारावर तेच चित्र नदीच्या पात्रात! इतकेच नव्हे तर आता तथि हेलिकॉप्टरने मंदिराजवळ पोहोचविणाऱ्या कंपन्यांची संख्या नऊ झाली आहे. त्यामुळे सतत हेलिकॉप्टर्सची घरघरही सुरू असते. लाखभरांचे असे चोचले पुरवायचे म्हटले की प्रचंड ताण वाढणार. तेच झाले.

त्यातच ऐशोआरामातील पर्यटक म्हटल्यावर त्याला तिथल्या खडतर हवामानाची माहिती असायचे कारण नाही, शिवाय सर्व सुविधा हाताशी असल्याने त्याच्याशी जुळवून घेण्याचा प्रश्नच नाही. अशा वेळी माणूस एखाद्या आपत्तीत सापडतो तेव्हा त्याच्यावर होणारा आघात प्रचंड असतो. तेच इथे घडले. ही बाब मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी होण्यास कारणीभूत ठरली.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार दि. १६ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# भाजपच्या भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेसचे 23 नगरसेवक एकजूट

## सिटी न्यूजच्या बातमीनंतर काँग्रेस गटनेता आले समोर

प्रतिनिधी १६ जून

**अकोला :** महानगर पालिकेतील काँग्रेस नगरसेवकांमध्ये फूट पडणार असल्याच्या चर्चांवर काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'काँग्रेसचे २१ निर्वाचित आणि २ स्वीकृत असे एकूण २३ नगरसेवक राहुल गांधींचे एकनिष्ठ शिपाई असून, भाजपच्या पैशांच्या आमिषाला कोणीही बळी पडणार नाही,' असा विश्वास काँग्रेस गटनेता व विरोधी पक्ष नेता डॉ.जीशान हुसेन यांनी व्यक्त केला.

गेल्या काही दिवसांपासून विरोधी पक्षनेते कार्यालयात उपस्थित राहत नसल्याच्या आरोपाचे खंडन करत त्यांनी प्रशासकीय सुस्ततेवर बोट ठेवले. 'हायकोर्टाच्या नोटीसनंतर नाईलाजाने प्रशासनाने आम्हाला चेंबर दिले. परंतु, त्यानंतरही कधी कर्मचारी न देणे, तर कधी कर्मचाऱ्याला सुट्टीवर पाठवणे अशा क्लृप्त्या करून भाजप आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे,' असा आरोप त्यांनी केला.

शहरातील विकासकामांच्या दुरवस्थेवर बोलताना ते म्हणाले की, 'महानगरपालिकेत भाजप आणि 'शहर सुधार समिती'चा मोठा भ्रष्टाचार सुरू आहे. लाद्यांच्या खरेदीतील घोटाळा असो की दलित वस्तीच्या निधी वाटपातील गैरव्यवहार, नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवले जात आहे.' आगामी सर्वसाधारण सभेत काँग्रेसचे सर्व २३ नगरसेवक भाजपचे महापौर आणि सभापतींच्या भ्रष्टाचाराचा बुरखा टराटरा फाडतील, असा इशाराही त्यांनी दिला. भाजप कडून पसरवल्या जाणाऱ्या अफवा ही केवळ जनतेचे लक्ष विचलित करण्याची राजकीय रणनीती असल्याचा टोलाही डॉ.जीशान हुसेन यांनी लगावला. भाजप आणि 'शहर सुधार समिती' द्वारे या शहरात जो भ्रष्टाचार सुरू आहे, ६०० रुपये घंटागाडी चा विषय असो दलित वस्तीच्या निधी वाटपातील भ्रष्टाचार असो; याशिवाय अनेक ठिकाणी सातत्याने भ्रष्टाचार सुरू आहे. नागरिकांना कोणत्याही सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत. असा आरोप काँग्रेस गटनेत्याने केला आहे.गेल्या काही दिवसांपासून विरोधी पक्षनेते कार्यालयात उपस्थित राहत नसल्याच्या आरोपाचे खंडन करत त्यांनी प्रशासकीय सुस्ततेवर बोट ठेवले. 'हायकोर्टाच्या नोटीसनंतर नाईलाजाने प्रशासनाने आम्हाला चेंबर दिले. परंतु, त्यानंतरही कधी कर्मचारी न देणे, तर कधी कर्मचाऱ्याला सुट्टीवर पाठवणे अशा क्लृप्त्या करून भाजप आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे,' असा आरोप त्यांनी केला.

# शिवसेनेच्या वतीने स्मार्ट मीटर विरोधात ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी १६ जून



**अकोला :** शिवसेनेच्या वतीने ग्राहकांवर बळजबरीने स्मार्ट मीटर लावण्याची प्रक्रिया तात्काळ थांबविण्यासाठी आंदोलन करण्यात आले. महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयात शिवसेनेने ठिय्या आंदोलन केले.

यावेळी आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. 'स्मार्ट मीटरची सक्ती बंद करा', 'वीज ग्राहकांवर अन्याय चालणार नाही', 'जय भवानी, जय शिवाजी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' अशा घोषणांनी महावितरण कार्यालय परिसर दुमदुमून गेला. ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा कोणताही निर्णय शिवसेना खपवून घेणार नाही, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना भविष्यातही रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. अकोला शहर तसेच जिल्ह्यातील अनेक वीज ग्राहकांना 'पुढील ४८ तासांत आपला वीज मीटर स्मार्ट मीटरमध्ये बदलण्यात येणार आहे' अशा आशयाचे संदेश पाठविले जात आहेत. मात्र स्मार्ट मीटर बसविणे अनिवार्य नसताना आणि संबंधित ग्राहकांकडून कोणतीही मागणी किंवा संमती घेतली नसताना अशा प्रकारे मीटर बदलण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. यासंदर्भात नागरिकांनी शिवसेना पक्षाकडे तक्रारी केल्या. सोबतच मीटर लावणारे कर्मचारी हे अरेरावी ची भाषा वापरत असल्याच्या सुद्धा तक्रारी झाल्या आहेत.

# राखीव वनातील अवैध सागवान वृक्षतोड प्रकरणी आरोपीला अटक

प्रतिनिधी १६ जून



**आलेगाव :** वनपरिक्षेत्रांतर्गत झरंडी नियतक्षेत्रतील राखीव वन क्षेत्रात नियमित गस्तीदरम्यान वनरक्षक यांना कुऱ्हाडीसह सागवान वृक्षांची चौकट घेऊन आरोपी दिसून आले. वनकर्मचारी यांनी आरोपीला ताब्यात घेतले असता आरोपीचे नाव बबन हरिसिंग जाधव रा. वसाली असे आहे तसेच

पुढील तपासादरम्यान संबंधित व्यक्तीच्या राहत्या घराची तपासणी करण्यात आली असता अवैध सागवान वनमाल व सागवान चौकटी आढळून आल्या. सदर मालाबाबत कोणतीही वैध कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. त्यामुळे वनमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील लागू तरतुदीनुसार वनगुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. जप्त वनमालाचे मूल्यांकन करण्यात येत आहे. सदर कारवाई श्री. पवन जाधव वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) आलेगाव यांचा मार्गदर्शना खाली वनपाल श्री. एन. एम. नाकाडे, वनरक्षक व्ही.जी.बावस्कर , एस. डी.मस्के, ए.पी.देशमुख, एस. सी. कदम, कु.पी.डी इंगळे , कु.पी. एस. बाभळे, ए. डी.सरदार , पी. एम. डोबळे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

वनसंपत्तीचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी असून वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड, वनमाल वाहतूक किंवा साठवणूक याबाबतची माहिती नागरिकांनी वन विभागास कळवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# मधमाशी पालनासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यभर मध केंद्र योजना (मधमाशापालन) राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्य स्वरूपात ५० टक्के अनुदान, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी, विशेष प्रशिक्षण सुविधा तसेच मधमाशा संवर्धनाबाबत जनजागृतीचा लाभ मिळणार आहे. योजनेचे अर्ज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या जिल्हा कार्यालय, अकोला येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अकोल्यातील आरडीजी पब्लिक स्कूलमध्ये २० जूनला रंगणार 'शार्क पूल'चा ग्रँड फिनाले

## 10 बाल-उद्योजक मांडणार बिझनेस आयडिया

**अकोला :** विद्यार्थ्यांमधील व्यवसाय कौशल्य, नेतृत्वगुण आणि नवीन कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'आरडीजी शार्क पूल – सीझन १' चा भव्य महाअंतिम सोहळा (ग्रँड फिनाले) येत्या २० जून २०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता आरडीजी पब्लिक स्कूल येथे होणार आहे.

हा उपक्रम पूर्णपणे विद्यार्थ्यांनीच शाळा व्यवस्थापनाच्या सहकार्याने आयोजित केला आहे. यामध्ये इयत्ता ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. देशभरातून आलेल्या शेकडो प्रवेशिकांमधून कठोर निवड प्रक्रियेनंतर अंतिम फेरीसाठी सर्वोत्तम 'टॉप १०' संघांची निवड करण्यात आली आहे. हे १० संघ अकोल्यातील नामवंत उद्योजक आणि गुंतवणूकदारांसमोर आपल्या बिझनेस आयडिया सादर करतील. विशेष म्हणजे, या उपक्रमाचे अधिकृत ज्ञान भागीदार म्हणून 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' यांनी सहकार्य केले आहे. तसेच, 'आरआरसी न्यूज' माध्यम भागीदार आणि 'अलेप प्लॅटफॉर्म, अकोला' हे स्ट्रॅटेजिक पार्टनर आहेत. ग्रँड फिनालेमध्ये सादर होणाऱ्या कल्पनांमध्ये जर भविष्यातील व्यावसायिक क्षमता आढळली, तर त्या कल्पनांच्या पुढील विकासासाठी अनुभवी उद्योजकांकडून थेट आर्थिक गुंतवणूक, मार्गदर्शन आणि व्यावसायिक सहकार्य मिळण्याची मोठी संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या बाल-उद्योजकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि कल्पना पाहण्यासाठी नागरिकांनी, पालकांनी व विद्यार्थ्यांनी या सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# हिवरखेडमध्ये अवैध डिझेल साठा जप्त



प्रतिनिधी १६ जून

**हिवरखेड :** सोनाळा मार्गावरील टी पॉईंट जवळ १५ रोजी पोलिसांनी सापळा रचून बोलेरो पिकअप मध्ये असलेला अवैध डिझल साठा अंदाजे १६०० लिटर किंमत १ लाख ५८ हजार १९० रुपये. तसेच ४ लाख रुपये किमतीची गाडी सुद्धा जप्त करण्यात आली.

आरोपी विकास चंदन घोगडे, निर्भयकुमार जवाहरप्रसाद मिश्रा दोन्ही राहणार सावली खेडा ता धारणी विरुद्ध वस्तू अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. डिझल साठा पुरवठा निरीक्षण अधिकारी अंजली कावरे यांच्या फिर्यादी नुसार पोलिसांनी हस्तगत केला. ही कारवाई अकोला पोलिस अधीक्षक अकोट उपविभागीय पोलीस अधिकारी याच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सचिन पाटील, गोपाल गिलबिले, अंजली कावरे निरीक्षन तहसील तेल्हारा, पो कॉ , विनोद खर्डे, पंकज मडावी, धीरज साबळे यांनी

# मिशन लक्षवेध योजनेंतर्गत क्रीडा प्रशिक्षकाला संधी

**अकोला :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत मिशन लक्षवेध योजना कार्यान्वित करण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यात मिशन लक्षवेध योजनेंतर्गत जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र सुरु करण्यात येत असून, सदर केंद्रासाठी मैदानी व वेटलिफ्टींग क्रीडा प्रकाराकरिता क्रीडा प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यानुसार पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल स्व. वसंत देसाई स्टेडियम अकोला येथे १९ जूनपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. जिल्ह्यातील पात्र व अनुभवी क्रीडा प्रशिक्षकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी केले आहे.

# बसस्थानक परिसरात खड्ड्यांमुळे प्रवासी त्रस्त

वि.प्रतिनिधी १६ जून



**अकोट :** अकोला जिल्ह्यात सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या बसस्थानकांपैकी एक असलेल्या अकोट बसस्थानकाच्या नव्या इमारतीचे बांधकाम सध्या सुरू आहे. मात्र, या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असतानाच बसस्थानक परिसरातील रस्त्यांची दुरवस्था समोर आली आहे. परिसरात ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवासी, नागरिक तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बसस्थानक हे शहरातील सर्वाधिक वर्दळीचे ठिकाण असल्याने दररोज हजारो प्रवाशांची येथे ये-जा असते. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच पडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना चालताना मोठी कसरत करावी लागत आहे.

नवीन बसस्थानकाच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असताना परिसरातील रस्त्यांची अशी अवस्था का झाली, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. बांधकाम साहित्याची वाहतूक आणि यंत्रसामग्रीमुळे रस्त्यांचे नुकसान झाल्याचेही बोलले जात आहे.

स्थानिक नागरिकांनी तसेच प्रवाशांनी संबंधित विभागाने तातडीने खड्डे बुजवून परिसरातील रस्ते दुरुस्त करावेत, अशी मागणी केली आहे. अन्यथा पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होऊन अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अकोट बसस्थानकाच्या नव्या बांधकामासोबतच परिसरातील मूलभूत सुविधांकडेही लक्ष देण्याची गरज असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# सरासरी पेक्षा कमी पावसाचे हवामान विभागाचे संकेत

## उशिरा पेरणीमुळे उत्पादनात घट येण्याची शक्यता

मोहम्मद इमरान १६ जून

**आलेगाव :** गतवर्षी जून महिन्यात सुरू झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या जून अखेर पूर्ण झाल्या होत्या यावर्षी मात्र जून महिना पूर्ण संपत असून पावसाची हजेरी सुद्धा न लागल्याने शेतकरी वर्गात चिंता निर्माण झाली आहे

यावर्षी सुरुवातीलाच भारतीय हवामान विभागाने देशासह राज्यात सरासरी पेक्षा कमी पाऊस पडणार असल्याचे संकेत दिले आहेत व त्याची प्रचिती सुद्धा येत आहे जून महिना संपत आला असून अकोला जिल्ह्याच्या बऱ्याच भागात अजून सुद्धा पावसाने हजेरी लावली नसल्याने यावर्षी पेरण्या ह्या जुलै महिन्यात जाणार असून उशिरा पेरणी केल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे,अशा परिस्थितीत शासनासह कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

तलाठी व कृषी सहायक हे शेतकऱ्यांना गरज पडली तरी बहुतेक गावात हजर राहत नाहीत किंवा शेतकऱ्यांचे फोन उचलत नाहीत त्यामुळे इतर शासकीय कर्मचारी यांच्याप्रमाणे कृषी सहायक व तलाठी यांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करावी जणेकसरून ते शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन व मदत करू शकतील.पीक विमा योजनेत बदल करून पीक कापणी प्रयोगावर आधारित विमा भरपाई न ठेवता आधीचे सर्व ट्रिगर लागू करावेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाला खात्रीलायक विमा कवच मिळेल.

> **पेरणी करु नये**
> तसेच प्रत्येक गावातील तलाठी व कृषी सहायक यांना मुख्यालयी हजर राहण्याची सत्ती करावी जणेकरून ते शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन करू शकतील
> **विनोद शालिग्रामजी राऊत**
> जिल्हा समन्वयक शेतकरी संघटना, मळसुर ता. पातूर

# दोन मजुरांवर गाव गुंडांचा चाकू हल्ला

प्रतिनिधी १६ जून



**पातूर :** शहरातील संभाजी चौक परिसरात खळबळजनक घटना घडली. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या दोन मजुरांवर एका गावगुंडाने चाकूने वार केल्याची माहिती समोर आली आहे.. या हल्ल्यात दोघेही जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विशाल ठाकरे, गोलू कपाटे असे जखमी झालेल्या युवकांचे नाव आहे.

या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. हल्ल्यात दोघेही रक्तबंबाळ झाले होते. हल्ला नेमका कशामुळे झाला याचा तपास पोलिस करीत आहेत. तसेच हल्लेखोरांचा देखील शोध घेत आहेत.

# सोनोरी ग्रामपंचायतचा स्मार्ट मीटरला विरोध

प्रतिनिधी १६ जून



गावकऱ्यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**मूर्तिजापूर :** सर्व गावकऱ्यांनी एकत्र येऊन सोनोरी ग्रामपंचायत मध्ये स्मार्ट मीटरच्या संदर्भात विरोध प्रदर्शन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलतात की गोरगरिबांना स्मार्ट मीटर साठी सक्ती होणार नाही दुसरीकडे वीज वितरण कंपनीचे ठेकेदार गावात फिरून शेतमजूर, शेतकरी यांच्या घरी जबरीने स्मार्ट मीटर लावण्याचे काम करीत आहे. ज्या विद्युत ग्राहकांच्या घरी हजार रुपये येणारा बिल आता पाच हजार रुपये पर्यंत येत असल्याने नागरिकांचा आक्रोश स्मार्ट मीटर संदर्भात सोनोरी गावातून दिसून येत आहे.

सामाजिक कार्यकर्ता अम्मू खान उर्फ अहमद खान, सरपंच नाजेरा परवीन सिकंदर खान, उपसरपंच भूषण कोकाटे, सदस्य कविता सचिन तायडे, शेख रियाज,फरिदा बी अब्दुल बासिद, निकिता आकाश वानखडे, उज्वल ठाकरे, फैमिदा बी अलीमुद्दीन, जय श्री बबन डगवाडे, युनुस शा , तसवर खान माजी उपसरपंच शेख जमील, शेख जब्बार वसीमोउद्दीन, रियाज अहमद ,बलवंत इंगळे, नाजूक इंगळे, साहेबराव इंगळे, दिनेश ताबंळे ,शंकर रुमाले, गजानन डगवाडे, शेख मधील जावेद खान;शे नदीम ,शे अजहर, सादिक शा, रशीद शहा, रऊफमौलाना, शेख अजीम शेख अलीम, शेख शकील व इतर गावकरी मंडळी मोठ्या प्रमाणात या विरोध प्रदर्शनामध्ये सहभागी झाली होती.

> **सोनोरी ग्रामपंचायत घेणार ठराव**
> महावितरण कंपनी व ठेकेदाराने स्मार्ट मीटर साठी सक्ती करू नये. गावात मीटर मध्ये कोणताही फॉल्ट नाही मग विनाकारण गोरगरिबांना का त्रास देतात या विषयाला घेऊन आम्ही ठराव घेणार आहोत. नाजेरा परवीन सिकंदर खान, सरपंच गावकरी आमरण उपोषणाला बसणार आतापर्यंत गावात १०० मीटर स्मार्ट लावण्यात आले आहे. ते मीटर एका महिन्याचे आत काढून पूर्वीचेच मीटर लावण्यात यावे अन्यथा गावकरी स्मार्ट मीटरच्या विषय आमरण उपोषण करणार.
> **अम्मू खान उर्फ अहमद खान**, समाज सेवक



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १६ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# एसटी कर्मचाऱ्यांचे घंटानाद आंदोलन

प्रतिनिधी १६ जून



**उमरखेड** : राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने सोमवारी उमरखेड बसस्थानकाच्या प्रवेशद्वारासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने एसटी कर्मचारी सहभागी झाले होते.

कर्मचारी संघटनांच्या म्हणण्यानुसार, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मान्य करण्यात आलेल्या विविध मागण्या अद्याप प्रलंबित आहेत. राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन लागू करावे, २०१६ ते २०२० या कालावधीतील कामगार करारानुसार कमी करण्यात आलेल्या वार्षिक वेतनवाढ व घरभाडे भत्त्याची थकबाकी अदा करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

तसेच सन २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी, औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानंतरही अद्याप देण्यात आलेली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ५८ टक्के महागाई भत्ता मागील थकबाकीसह लागू करावा, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

याशिवाय घरभाडे भत्त्याचे सुधारित दर थकबाकीसह लागू करणे, एसटी महामंडळासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद करणे, मध्यवर्ती कार्यशाळांमध्ये नवीन बस बांधणीसाठी चॅसिस उपलब्ध करून देणे, वर्ग-दोन कनिष्ठ दर्जा प्राप्त कर्मचाऱ्यांना त्यानुसार वेतनश्रेणी लागू करणे तसेच महामंडळात कंत्राटी भरती न करण्याच्या मागण्याही आंदोलकांनी मांडल्या. आंदोलनात एसटी कामगार संघटनेचे आगाराध्यक्ष विकास सूर्यवंशी, सचिव सुरेशभाऊ मोरे, कोषाध्यक्ष संजय कदम, कार्याध्यक्ष गजानन नंदनवार, वरिष्ठ लिपिक कांगणे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## दारव्ह्यात तलवार बाळगणाऱ्यास अटक

प्रतिनिधी १६ जून

**यवतमाळ** : दारव्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका इसमाला स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक धारदार तलवार जप्त केली आहे. दिनांक १४ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दारव्हा परिसरात गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, सय्यद शहादत सय्यद मुजफर (वय ३५, रा. अतारपुरा, दारव्हा) हा मल्लीकार्जुन मंदिर परिसरात अवैध तलवार बाळगून फिरत आहे. या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ पंचांसह घटनास्थळी धाव घेतली.मंदिर परिसरात संशयित इसम हातात चंद्राकार आकाराची धारदार तलवार घेऊन उभा असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव सय्यद शहादत सय्यद मुजफर असल्याचे सांगितले. त्याच्याकडून अंदाजे १,००० रुपये किमतीची धारदार तलवार जप्त करण्यात आली. या प्रकरणी दारव्हा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८६/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पाडली.

# कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द करा; सरसकट दोन लाखांची कर्जमाफी द्या

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची कृषिमंत्र्यांकडे मागणी**



**प्रमुख मागण्या :** २०१९ च्या कर्जमुक्ती योजनेतील लाभार्थ्यांसाठी ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करावी. सर्व शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी. ओटीएसची अट रद्द करावी. २०१९ च्या लाभार्थ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी लागू करावी. प्रोत्साहनपर अनुदानासाठी चार वर्षांची अट शिथिल करावी. कर्जमाफी योजनेतील जाचक अटी तातडीने रद्द कराव्यात. राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना न्याय मिळेल, अशी सुधारित योजना जाहीर करावी.

प्रतिनिधी १६ जून

**कळंब** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कळंब तालुका शाखेच्या वतीने करण्यात आली. तसेच आमदार रोहित पवार यांच्या 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यात आला.

तालुकाध्यक्ष दिलीपराव इंगोले व ग्रामीण युवती कार्याध्यक्षा मनिषा काटे (भोसले) यांच्या नेतृत्वाखाली कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना तहसीलदारांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. २०१९ ते २०२६ या कालावधीतील दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाला कर्जमाफी देण्याची घोषणा करण्यात आली असली, तरी २०१९ मधील महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचीच माफी देण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. तसेच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना एकरकमी तडजोड योजनेअंतर्गत (ओटीएस) अतिरिक्त रक्कम भरल्यानंतरच कर्जमाफीचा लाभ देण्याची अट अन्यायकारक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे कर्जाची नियमित परतफेड बंधनकारक करण्यात आल्याने अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहतील, असा दावाही करण्यात आला. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही पक्षाच्या वतीने देण्यात आला.

# नगरपंचायत निवडणुकांचे प्रमुखपदी प्रा.प्रविण प्रजापती

**पाच नगरपंचायतींवर भाजपाचा विजयाचा संकल्प**

प्रतिनिधी १६ जून




**यवतमाळ** : आगामी काळात होणाऱ्या कळंब, बाभुळगाव, राळेगाव, मारेगाव आणि झरी-जामणी नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने तयारीला वेग दिला आहे. या पाचही नगरपंचायत निवडणुकांचे प्रमुख म्हणून प्रा. प्रविण प्रजापती यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रफुलसिंग चौहान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणूक व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ही जबाबदारी देण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना प्रजापती यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विकासात्मक, धोरणात्मक आणि कल्याणकारी योजनांच्या बळावर तसेच भाजपच्या मजबूत संघटनात्मक शक्तीच्या जोरावर पाचही नगरपंचायतींवर भाजपाचा विजयाचा झेंडा फडकविण्याचा निर्धार व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची १२ वर्षांची विकासकामे, राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व, आमदार मदन येरावार तसेच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या विकासकामांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून आगामी निवडणुकांमध्ये भाजपाला यश मिळवून देण्याचा संकल्प केला.

# मोदी सरकारच्या १२ वर्षपूर्तीनिमित्त धोंगडे पीर बाबा दर्ग्यावर चादर अर्पण

प्रतिनिधी १६ जून



**उमरखेड** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाची १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चा, उमरखेडच्या वतीने हजरत धोंगडे पीर बाबा (राहे) दर्ग्यावर चादर अर्पण करून देशाच्या प्रगती, शांतता आणि समृद्धीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली.

हा कार्यक्रम भाजप पुसद-यवतमाळ जिल्हा समन्वयक नितीन भुताडा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी जमाल सिद्दीकी यांच्या संकल्पनेतून देशभरातील सुफी संतांच्या दर्ग्यांवर चादर अर्पण, फातिहा पठण आणि राष्ट्रासाठी दुवा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार महाराष्ट्र भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इंद्रिस मुलतानी व प्रदेश सचिव रमजान अन्सारी यांच्या मार्गदर्शनाखाली उमरखेड येथे हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी हजरत धोंगडे पीर बाबा दर्ग्यात फातिहा व सलाम पठण करण्यात आले. दर्ग्याचे खादीम सय्यद नूर सय्यद नबी, सय्यद साबीर सय्यद नबी तसेच मौलवींनी धार्मिक विधी पार पाडले. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे पुसद-यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष रहेमत जागीरदार यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली.

कार्यक्रमाला भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. इरफान कुंदन, पुसद-यवतमाळ जिल्हाध्यक्ष मोहम्मद अतीक मौलाना यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जिल्हा उपाध्यक्ष इस्राएल बाबा, ज्येष्ठ नेते सय्यद सादिक ठेकेदार, ॲड. जावेद खान, ॲड. अताउल्लाह पटेल, सय्यद तेहेजार, सय्यद रझीक, शेख हमीद यांच्यासह अल्पसंख्याक मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमातून राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देण्यात आला.

# निराधार महिलेला वैश्विक विकास संस्थेचा आधार

प्रतिनिधी १६ जून



**पुसद** : शेंबाळपिंपरी येथील अपघातग्रस्त व निराधार महिला धूरपताबाई भोसले यांना वैश्विक विकास संस्थेच्या वतीने निवाऱ्यासाठी टिनपत्रे उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपली आहे.

धूरपताबाई भोसले यांचा काही दिवसांपूर्वी अपघात झाल्याने त्यांच्यासमोर निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.

आर्थिक व सामाजिक आधार नसल्याने त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. ही बाब पोलिस पाटील प्रतिनिधी बापुराव कांबळे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पुढाकार घेत वैश्विक विकास संस्थेशी संपर्क साधला.

परिस्थितीची माहिती मिळताच संस्थेने तातडीने मदतीचा निर्णय घेत धूरपताबाई यांना घरासाठी आवश्यक टिनपत्रे उपलब्ध करून दिली. शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत ही मदत त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात आली.

यावेळी सरपंच रविंद्र महल्ले, मतीन पहिलवान, सुरेश वाकडे, सुनील वाहुळे, किशोर तळणकर यांच्यासह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

मिळालेल्या मदतीबद्दल धूरपताबाई भोसले यांनी वैश्विक विकास संस्था व बापुराव कांबळे यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे गरजू महिलेला आधार मिळाला असून गावकऱ्यांकडून संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

# श्री स्वामी समर्थ केंद्रात मोफत कान-नाक-घसा तपासणी शिबिर

प्रतिनिधी १६ जून



**पुसद** : श्री स्वामी समर्थ केंद्र, सप्तगिरी नगर येथे स्व. चुनीलाल मोतीभाई पटेल चॅरिटेबल ट्रस्ट, यवतमाळ यांच्या सहकार्याने तसेच मातोश्री विठाबाई मारोतराव ट्रस्ट, पुसद यांच्या वतीने आयोजित मोफत कान, नाक व घसा तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

गांधीवादी विचारांचा आदर्श समोर ठेवून समाजसेवेचे व्रत स्वीकारलेले डॉ. अनिल पटेल हे १९८० पासून विविध राज्यांतील ग्रामीण भागात आरोग्यसेवा पुरवत आहेत. त्यांच्या या सेवाकार्यात चंद्रशेखर पिपराडे, दिलीप फुसे आणि कमलेश पांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

शिबिराच्या प्रारंभी श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने डॉ. अनिल पटेल व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्राचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिबिरादरम्यान नागरिकांची कान, नाक व घशाची तपासणी करण्यात आली. गरजूंना औषधोपचारासह आरोग्यविषयक मार्गदर्शनही देण्यात आले. विविध आजारांचे प्राथमिक निदान झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

श्री स्वामी समर्थ केंद्र, सप्तगिरी नगरच्या वतीने सातत्याने सामाजिक, आरोग्यविषयक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात आहेत.

या उपक्रमांमुळे परिसरातील नागरिक व भक्तगणांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून केंद्राच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# घोडखिंडीत पाणीटंचाई; गावकऱ्यांची पंचायत समितीवर धडक

**युवकांचा एल्गार; आमदार, गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन**

प्रतिनिधी १६ जून




**यवतमाळ** : गेल्या महिनाभरापासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या घोडखिंडी येथील ग्रामस्थांनी अखेर आक्रमक भूमिका घेत आमदार बाळासाहेब मांगुळकर व गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यास घागरी व पाण्याची भांडी घेऊन आंदोलन छेडण्याचा इशाराही युवकांनी दिला आहे.

घोडखिंडी गावात पिण्याच्या पाण्याची कोणतीही नियमित व्यवस्था नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी शेतशिवार आणि जंगलालगतच्या विहिरींची धाव घ्यावी लागत आहे. पाण्याच्या शोधात वनक्षेत्रात जावे लागत असल्याने वन्यप्राण्यांचा धोका निर्माण झाला असून जीवितहानीचीही भीती व्यक्त करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीकडून होत असलेला अपुरा पाणीपुरवठा गावकऱ्यांच्या अडचणी वाढवत असल्याचा आरोप करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर युवकांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली. निवेदनाची दखल घेत आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी नव्या पाईपलाईनचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती देण्यात आली. तसेच गटविकास अधिकारी पुढील दोन दिवसांत गावाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी करतील, असे आश्वासनही देण्यात आले.

दरम्यान, येत्या काही दिवसांत पाणी समस्येवर कायमस्वरूपी तोडगा न निघाल्यास ग्रामस्थांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सूरज खोब्रागडे यांनी दिला.

यावेळी गावातील युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीटंचाईच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी एकमुखी मागणी गावकऱ्यांनी केली.

# बाळोदीत अवैध दारुभट्ट्यांवर धाड



प्रतिनिधी १६ जून

**उमरखेड** : तालुक्यातील बाळोदी येथे सुरू असलेल्या अवैध दारू निर्मितीविरोधात उमरखेड पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने धडक कारवाई करत दोन अवैध दारूभट्ट्यांचा पर्दाफाश केला. या कारवाईत सुमारे ५५० लिटर मोहमास सडवा व दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण १९ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांना बाळोदी येथील पुष्पा अशोक भगत व लिलाबाई संभाजी धुळे यांच्या ताब्यातील ठिकाणी अवैधरीत्या दारू निर्मिती सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार डीबी पथकाने छापा टाकून कारवाई केली.

कारवाईदरम्यान मोहमास सडव्याचे नमुने पंचासमक्ष घेण्यात आले. त्यानंतर उर्वरित सडवा तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य कायदेशीर प्रक्रियेनुसार जागेवरच नष्ट करण्यात आले. संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई सपोनि. व्यंकट गंगलवाड, पोउपनि. शरद लोहकरे, पोलीस हवालदार चंदन जाधव, पोलीस कॉन्स्टेबल दिगांबर गीते व संघशील टेंबरे यांनी केली.

या कारवाईमुळे बाळोदी परिसरातील अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून अशा बेकायदा धंद्यांविरोधातील मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि.१६ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# विभागीय बुडो मार्शल आर्ट प्रशिक्षण व पंच प्रशिक्षण शिबीर

**अमरावती :** रविवार दिनांक १४ जुन रोजी श्री. एकविरा देवी मंगल कार्यालय अमरावती येथे १ दिवसीय विभागीय बुडो मार्शल आर्ट प्रशिक्षण व पंच प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. प्रसंगी बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष शिहान लहू पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली बुडो फेडरेशन इंडियाचे तांत्रिक अधिकारी शिहान सचिन पट्टेकर, बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्रचे तांत्रिक अधिकारी शिहान संतोष कुलकर्णी यांच्या उपस्थितीत अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना बुडो मार्शल आर्ट या खेळाबद्दल माहिती व प्रशिक्षण देण्यात आले. सोबतच शिबिरात अमरावती विभाग व जिल्हा अध्यक्ष सेन्सेई उमेश भा. मोवळे यांच्या आयोजनात अमरावती विभागातील बुलडाणा, वाशीम व अमरावती जिल्ह्यातील प्रशिक्षक यांची पंच प्रशिक्षण प्राप्त करित परीक्षा उत्तीर्ण झाले.

# संपामुळे आजपासून राज्यातील आरटीओ सेवा ठप्प होणार

## ◆ प्रलंबित मागण्यांवर शासनाची चालढकल; आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा एल्गार

प्रतिनिधी १६ जून

**अमरावती:** मोटार वाहन आरटीओ विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासन व प्रशासनाकडून सातत्याने टोलवाटोलवी होत असल्याचा आरोप करत राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी १६ जून पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या संपामुळे राज्यभरातील आरटीओ कार्यालयांमधील अनेक सेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, विभागाचा आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षांचा कालावधी लोटला असतानाही सेवा प्रवेश नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनेक कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहत असून त्यांचे आर्थिक तसेच सामाजिक नुकसान होत आहे. याशिवाय इतरही अनेक प्रलंबित प्रश्नांवर शासनाने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी २ जून रोजी दोन तासांचे धरणे-निदर्शने तसेच ९ जून रोजी एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारला होता. मात्र त्यानंतरही शासन व प्रशासनाकडून कोणतीही सकारात्मक भूमिका घेण्यात आली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

कर्मचाऱ्यांच्या बहुतांश मागण्या प्रशासन स्तरावरच निकाली निघू शकतात. यासाठी संघटनेने वारंवार पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रे सादर केली असतानाही प्रशासन मार्गदर्शनाच्या नावाखाली प्रस्ताव शासनाकडे पाठवून वेळकाढूपणा करीत असल्याची टीका संघटनेकडून करण्यात आली आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. मात्र त्या बैठकीचे इतिवृत्त अद्याप उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे.

दरम्यान, संघटनेची तातडीची बैठक १३ जून रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सविस्तर चर्चा करून बेमुदत संपाशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लक नसल्याची भूमिका व्यक्त केली. त्यानुसार १६ जूनपासून राज्यातील सर्व आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असून त्याद्वारे शासनाविरोधातील आपला रोष व्यक्त करणार आहेत.

शासन व प्रशासनाने प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा कर्मचारी आंदोलनातून माघार घेणार नाहीत, असा इशारा संघटनेचे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत तातडीने प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे अध्यक्ष अनिल मानकर, संदीप खवले, गजानन तनपुरे, सुनील गुल्हाने, दीपक पोटे, अमोल खिरोडकर, राहुल शिरसाठ, किशोर देशमुख, अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल गंगाखेडकर, प्रमोद राजनेकर, अमोल माटोडे, साजिद अली, श्वेता वैद्य, रोहिणी दातार, मीनल गिऱ्हे, लता कानडे, अश्विनी चव्हाण, अमोल गंगाखेडकर, उमेश तिवारी, हर्षदा चव्हात, वृषाली महल्ले, वैशाली निंभोरकर, स्मिता सिरमलवार, प्रीती डोंगरे, मनोज खोब्रागडे, जयसिंग राठोड, नितीन मुखे, अनिल मेश्राम, अरुण वाघमारे, संदीप अडागडे, राजेश राऊत, आशिष माथुरकर, देवेंद्र कळमकर, उज्वल ठाकरे, राजेश पाटील, रवींद्र रुद्रकार, संतोष घ्यार, सुनील सोळंकी, प्रवीण तायवाडे, समीक्षा वारकरी, किशोर आडे, मीना मडावी, विनोद पिंगे, रामकृष्ण खंडारे, गजानन धुर्वे, संदीप राठोड, निखिल भेंडारे, सोहन हेमने, डेविन जुमळे, नितीन भेंडारे, शारदा हेडाऊ, रस्मिता पवार, प्रवीण मुंगळे, देवानंद खंडारे, विशाल शिवनकर, स्वप्निल सहारे आदी राज्यातील कर्मचारी वर्गाने दिलेला आहे.

**या आहेत मागण्या:** वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी या २३ पदांचे पदोन्नती प्रस्ताव कित्येक दिवसापासून मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहे त्यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे. कार्यालय अधीक्षक पदाचे सेवा प्रवेश नियम प्रलंबित असल्याने सेवा प्रवेश नियम तयार करण्यास प्राधान्य द्यावे.

,सहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता या पदाचे सेवा प्रवेश नियम नसल्याने विभागातील विधी पदवीधारक नियुक्ती पासून वंचित आहेत, वर्ग ३ संवर्गातील सर्व पदांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात यावे, पदनाम बदल - लिपिक टंकलेखक, वरिष्ठ लिपिक या पदाचे परिवहन सहाय्यक व वरिष्ठ परिवहन सहाय्यक पदनाम बदल करण्यात यावे, आश्वासित प्रगती योजना- वरिष्ठ लिपिक व कार्यालय अधीक्षक पदावरील कर्मचाऱ्यांना सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अद्याप दिलेले नाही ते तात्काळ देण्यात यावे.

,प्रतिनियुक्ती रद्द केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कायमस्वरूपी बदल्या संबंधित विभागात करण्यात याव्यात, परिवहन आयुक्त कार्यालयातील प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांना बदली कायदा २००५ लागू करण्यात यावा.

**सेवा प्रवेश नियम रखडल्याने पदोन्नतीचा प्रश्न गंभीर**
यापूर्वी निदर्शने व लाक्षणिक संपानंतरही तोडगा नाही. १६ जूनपासून राज्यव्यापी बेमुदत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला.

# व्यक्ती निर्माणातूनच राष्ट्रनिर्मिती शक्य- सुहास हिरेमठ

## ◆ 'अमृत' संस्थेच्या पाच दिवसीय निवासी कर्मचारी प्रशिक्षण संपन्न

प्रतिनिधी १६ जून

**अमरावती:** समाजातील सर्व वर्गांची उन्नती करणे हे सरकारचे काम आहे. समाजातील कोणताही वर्ग मागे राहिला, तर संपूर्ण समाज मागे राहतो आणि दुर्बल बनतो. अशा सर्व घटकांना पुढे येण्यासाठी आधार देण्याचे काम 'अमृत' सारख्या संस्था करत आहेत. मात्र, समाजाची उन्नती करत असताना त्यांचे चारित्र्य निर्माण करणे हेही आपले कर्तव्य आहे. व्यक्ती निर्माणातून जेव्हा चारित्र्यनिर्माण होते, तेव्हाच देश खऱ्या अर्थाने घडतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते सुहास हिरेमठ यांनी कर्मचारी प्रशिक्षण वर्गात केले.

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) च्या वतीने आयोजित पाच दिवसीय कर्मचारी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन श्री हिरेमठ यांच्या हस्ते रविवारी झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. हे निवासी शिबिर अमृतच्या औंध (पुणे) येथील मुख्यालयात १४ जून ते १८ जून या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

पुढे बोलताना सुहासजी हिरेमठ म्हणाले की, ठआपण कैक पटींनी पुण्यवान आहोत म्हणून आपला जन्म भारतात झाला. आपल्या देशातील प्रत्येक नागरिक सुशिक्षित होण्यासोबतच सुसंस्कृतही झाला पाहिजे. स्वार्थी आणि संकुचित वृत्तीचा त्याग करून सर्वांनी 'राष्ट्रप्रथम' या भावनेने कार्य करणे अपेक्षित आहे. यासाठी स्वदेशी, स्वभाषा, संस्कृती आणि बचत या गोष्टी अंगीकाराव्या लागतील. अमृतचे प्रतिनिधी म्हणून केवळ कर्मचारी न होता, 'कार्यकर्ता' या भावनेने काम केले तर व्यक्ती निर्माणातून राष्ट्रनिर्मिती होईल. कामातून माणूस जोडला जाणे महत्त्वाचे असून, आपल्याला मिळालेल्या कामाची उंची आणि खोली वाढवण्याचा प्रयत्न सर्वांनी केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी 'अमृत' संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून संस्थेची सुरुवात आणि इथपर्यंतचा संघर्षमय प्रवास उपस्थितांसमोर उलगडला. अमृत संस्थेने केलेल्या प्रगतीची दखल आज राज्यभरातील अनेक संस्था घेत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. अशा प्रशिक्षण शिबिरांमधून कर्मचाऱ्यांनी नवीन उपक्रम, कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण कल्पना शिकण्याची गरज असल्याचे सांगत, ठयापुढे सर्वांनी अधिकाधिक जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने कार्य करणे अपेक्षित आहे, असे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत उत्साहात 'भारतमाता पूजनाने' झाली. या पाच दिवसीय निवासी शिबिरासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमधून अमृत व्यवस्थापक, अमृत मित्र आणि अमृत सखी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकल महिला धोरणासाठी १७ जून रोजी जिल्हास्तरीय बैठक

## ◆ ठोस उपाययोजनांसह प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी १६ जून

**अमरावती:** महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी एक स्वतंत्र आणि व्यापक 'एकल महिला धोरण' तयार करण्यात येत असून, हे धोरण अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने बुधवार, दिनांक १७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद अमरावतीच्या पंजाबराव देशमुख सभागृहात जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीमध्ये एकल महिलांचे प्रश्न केवळ मांडण्याऐवजी त्यावर ठोस मार्ग काढण्याच्या उद्देशाने चर्चा केली जाणार असून, जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञांना या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे.

या धोरणाचा मसुदा तयार करताना केवळ त्रोटक स्वरूपातील मते किंवा समस्या मांडण्याऐवजी, त्या समस्यांवर शासनाने नेमक्या कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणती नवीन योजना सुरू करावी, विद्यमान योजनांमध्ये काय बदल करावेत आणि आवश्यकतेनुसार कोणत्या कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात, याविषयी सविस्तर आणि अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. नागरिकांनी पाठवणाऱ्या या प्रस्तावामध्ये संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि त्याचे अपेक्षित परिणाम या गोष्टींचा प्रामुख्याने समावेश असावा. ज्या नागरिकांना किंवा संस्थांना बैठकीव्यतिरिक्त आपले अभिप्राय थेट प्रशासनापर्यंत पोहोचवायचे आहेत, त्यांच्यासाठी प्रशासनाने ८२०८५८१९१५ हा अधिकृत व्हॉट्स?प क्रमांक जाहीर केला असून, प्राप्त होणाऱ्या सर्व नाविन्यपूर्ण सूचना व अभिप्रायांचा 'एकल महिला धोरणाचा' मसुदा तयार करताना योग्य तो विचार केला जाईल, तरी अमरावती जिल्ह्यातील सर्व संबंधित घटकांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# बिबट्याच्या कातडीचा तुकडा बाळगणाऱ्या तीन आरोपींना अटक

प्रतिनिधी १६ जून

**अमरावती:** गुगामल वन्यजीव विभागांतर्गत वन्यजीव गुन्हे नियंत्रण कक्ष, हरिसाल वनपरिक्षेत्रातील वन कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त कारवाईत बिबट्याच्या कातडीचा तुकडा बेकायदेशीररीत्या बाळगणाऱ्या तीन आरोपींना शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी अटक करण्यात आली. सदर कारवाईदरम्यान आरोपीकडून बिबट्याच्या कातडीचा एक तुकडा जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मांगीलाल किशोरी इवणे (वय ४५ वर्ष), रा. चिरा, जि. बैतुल (म.प्र.), पोलीस स्टेशन दामजीपुरा, दिपक बाबुलाल उईके (वय २५ वर्षे), रा. ढालगाव, जि. खंडवा (म.प्र.), पोलीस स्टेशन रोशनी. कमल रतन ठाकूर (वय ३१ वर्ष), रा. धामा गोलाई, जि. खंडवा (म.प्र.), पोलीस स्टेशन -रोशनी यांचा समावेश आहे.

या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास गुगामल वन्यजीव विभागामार्फत सुरू असून, जप्त करण्यात आलेल्या बिबट्याच्या कातडीचा उगम, त्यामागील संभाव्य वन्यजीव गुन्हेगारी साखळी, तसेच इतर संबंधित व्यक्तीचा सहभाग याबाबत सखोल चौकशी करण्यात येत आहे. सदर कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी शुभांगी राऊत, दिनेश केंद्रे, स्वप्नील राऊत, मुकेश जावरकर, अनंता नायसे, हरिसाल वनपरिक्षेत्रातील राजेश धुमाळे, मनिषा भुसुम, ज्योती धिकार तसेच वन्यजीव प्रेमी चेतन भारती यांच्या सहभागाने पार पडली. वन्यजीवांच्या अवयवांची बेकायदेशीर शिकार, वाहतूक, व्यापार किंवा ताबा हा गंभीर व दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती नागरिकांनी तात्काळ वन विभागास द्यावी, असे आवाहन गुगामल वन्यजीव विभागामार्फत करण्यात आले आहे.

# अमरावतीच्या कुमकुम मोहोडचा जागतिक धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णवेध

## ◆ मिक्स्ड टीम प्रकारात भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक

प्रतिनिधी १६ जून




**अमरावती:** तुर्की येथील अंतालिया येथे ९ ते १४ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-३' (धनुर्विद्या विश्वचषक) स्पर्धेत भारतीय संघाने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. अमरावतीच्या खेलो इंडिया केंद्राची प्रशिक्षणार्थी कुमकुम मोहोड हिने भारतीय संघातील धीरज बोम्मादेवरा राय याच्यासह मिक्स्ड टीम (मिश्र संघ) प्रकारात अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा ५-१ अशा सेट फरकाने पराभव करून भारताला हे ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून दिले आहे.

अमरावती येथील खेलो इंडिया धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्रात मागील आठ वर्षांपासून राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करणाऱ्या कुमकुमच्या या सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय यशामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचा गौरव वाढला आहे. तसेच यापूर्वीही चीन येथे झालेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत तिने भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. कुमकुमच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे. उपसंचालक तथा जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर आणि अध्यक्ष ॲड. श्री. प्रशांत देशपांडे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. कुमकुमची सध्याची प्रगती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सातत्य पाहता ती आगामी स्पर्धांमध्येही भारताला आणखी पदके मिळवून देईल, असा विश्वास तिचे प्रशिक्षक प्रफुल डांगे यांनी व्यक्त केला असून कुमकुम आता जुलै २०२६ मध्ये स्पेन येथे होणाऱ्या 'वर्ल्ड कप स्टेज-४' आणि जपान येथे होणाऱ्या '२० व्या आशियाई क्रीडा' स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे

# हर्षजीत देशमुख अद्यापही ॲडमिटच, भाजपाने केली एकतर्फी निवडणूक

संदीप मानकर १६ जून

**अमरावती:** विधान परिषद मतदार संघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख अद्यापही नागपूर येथे एका खाजगी रुग्णालयात ॲडमिट असल्याने भाजपाचे महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे यांच्यासाठी हे निवडणूक एकतर्फी झाली असून ते तिसऱ्यांदा निवडून येण्यासाठी सज्ज झाले आहेत.

निवडणूक जरी तिरंगी असली तरी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार किस गली मे खसखस असल्याने प्रवीण पोटे यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

विशेष म्हणजे हर्ष जीत देशमुख नागपूरच्या रुग्णालयात दाखल होतात,. काँग्रेसचा चांगलाच पोळा फुटला असून अंतर्गत कलह पुढे आला आहे. काँग्रेसमध्येच एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडल्या गेल्या.

मात्र राजकारणातील चाणक्य असलेले माजी मंत्री प्रवीण पोटे यांनीही निवडणूक एकतर्फी केली आहे.

सुरुवातीला विप्लव बाजोरिया यांनी शिंदे सेनेमध्ये बंड करून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

मात्र त्यांचा नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने खरीच केल्याने त्यांनी आधी हायकोर्टात नंतर सुप्रीम कोर्टात धाव घेतली मात्र त्या ठिकाणी त्यांचा अर्ज स्टँड न राहल्याने काँग्रेस सोबत फाईट होईल असे वाटत होते मात्र निवडणुकीने काही दिवसात वेगळा टीव्हीस्ट घेतला. काँग्रेसचे अधिकृत उमेदवार हर्षेजित देशमुख अचानक गायब झाले ते प्रचार करत नसल्याची चर्चा होतात ते रुग्णालयात ॲडमिट असल्याचे पुढे आले. त्यानंतर माजी मंत्री यशोमती ठाकूर व हर्ष जित देशमुख यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी रंगून काँग्रेसमध्ये शीतयुद्ध रंगले.

मात्र अजूनही निवडणुकीला दोन दिवस उरले असतानाही हर्षेजित देशमुख प्रचारात उतरले नाही.



**काँग्रेसचा एकही बडा नेता अमरावती फिरकला नाही**
विशेष म्हणजे विधान परिषद सारखी महत्त्वाची निवडणूक अमरावतीत होत असताना काँग्रेसचा एकही बडा नेता अमरावती साधा फिरायला सुद्धा नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही येण्याची तसदी घेतली नाही. मात्र भाजपाची निवडणूक एकतर्फी होत असतानाही अमरावतीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह अनेक नेते अमरावती येऊन त्यांनी प्रवीण पोटे यांना निवडून आणण्यासाठी मोर्चा बांधणी केली. विशेष म्हणजे महायुतीतील सर्वच आमदार यांनी निवडणूक डोक्यावर घेऊन प्रवीण पोटे यांना निवडून आणण्यासाठी कंबर कसली. त्यामुळे काँग्रेसमध्ये नेमकं सुरू तरी काय आहे? असा सवालही आता मतदार करत आहेत.

**निवडणुकीच्या निमित्ताने राणा- पोटे एकत्र**
मात्र एक चांगले झाले विधान परिषदेच्या निवडणुकीच्या दृष्टिकोनातून आमदार रवी राणा व माजी मंत्री प्रवीण पोटे एकत्र आले. त्यांचे मनोमिलन करण्यामध्ये संकट मोचन म्हणून राज्यसभा खासदार डॉक्टर अनिल बोंडे यांनी श्रेय घेतले.
मात्र, निवडणुकीसाठी सर्व मतभेद, मनभेद विसरून एकत्र यावे, मतदारांमध्ये मेसेज चांगला जाते असे कान थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोटे व राणांचे टोचल्याचेही राजकीय जाणकारांमध्ये चर्चा आहे. निवडणुकीच्या पूर्वी माजी खासदार नवनीत राणा यांनी पोटे यांना उमेदवारी मिळू नये व उमेदवारी डॉक्टर नितीन धांडे यांना मिळावी. यासाठी बरेच प्रयत्न केले. मात्र या निवडणुकीत राजकीय धुरंदर ठरलेले प्रवीण पोटे यांनी सर्वांनाच सर्व आघाडीवर चित करून आपणच या निवडणुकीतले चाणक्य असल्याचे पुन्हा सिद्ध केले. भविष्यात ते लवकरच पालकमंत्री झाल्यास कोणीही वावगे ठरू नये.

त्यामुळे काँग्रेस मधला संभ्रम कायम आहे. आपण नेमके मतदान कोणाला करावे? असा संभ्रम काँग्रेसच्या नगरसेवकांमध्ये आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीचे पारडे जड झाले आहे.

**काँग्रेस जवळ एकही सक्षम नेता नव्हता का?**
आठ वर्षानंतर विधान परिषदेची निवडणूक होत आहे ही निवडणूक भविष्यातील इतर निवडणुकीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची निवडणूक मानल्या जात आहे. मात्र या निवडणुकीकडे काँग्रेसच्या नेत्यांनी सपशेल दुर्लक्ष केले. शेवटपर्यंत काँग्रेसमध्ये स्थानिक उमेदवार देण्याच्या दृष्टिकोनातून एकमत न झाल्याने कुणाच्याही ओळखीत नसलेले नागपूर येथील उद्योजक हर्षजीत देशमुख यांना ऐन वेळेस काँग्रेसला आयात करावे लागले. मात्र ते तुल्यबळ लढत देतील अशी शक्यता होती. मात्र ऐन वेळेस त्यांनी नाग्या टाकल्याने ही निवडणूक भाजपासाठी एकतर्फी झाली. मात्र विधान परिषद निवडणूक लढवण्यासाठी माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री डॉक्टर सुनील देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखवात ,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, विरोधी पक्ष नेते माजी महापौर विलास इंगोले यांच्यासारखे सक्षम तगडे उमेदवार असताना काँग्रेसने हा उमेदवार आयात का केला? यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून निवडणुकीनंतर हाय कमांडकडे याची उत्तरे काँग्रेसचे नेत्यांना द्यावी लागणार आहेत. मात्र या निवडणुकीतही गतनिवडणुकीसारखा हर्षजित देशमुख यांचा माधवगढीया झाला. अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये रंगू लागली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि १६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## नैसर्गिक शेती ही काळाची गरज - विनोद जाधव

**मंगरुळपीर :** कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम व भाजपा किसान मोर्चा जिल्हा वाशिम यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित नैसर्गिक शेती कार्यशाळा दिनांक ११ जून २०२६ रोजी कृषी महाविद्यालय करडा ता रिसोड येथे आयोजित करण्यात आली होती. प्रसंगी शेतीमध्ये रसायनांच्या अती वापराने जमिनीचे आरोग्य खालावत चालले आहे. त्यामुळे सुपीक जमीन नापीक होत असून हिरवळीचे खते, जैविक कीटक व बुरशी नाशके, जैविक खते यांचा वापर करून रासायनिक खताचा वापर आपण कमी करू शकतो. आणि त्यामुळे जमिनीचे सुपोषण करून मातीचे आरोग्य आपण सुधारू शकतो. आत्मनिर्भर भारत करण्यासाठी नैसर्गिक शेती काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जाधव यांनी केले. अशा विविध प्रकारच्या योजनांद्वारे केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी शक्य ते प्रयत्न करत असल्याचे मत जाधव यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेस शेतकरी, महिला बचत गट सदस्य आणि कृषी क्षेत्राशी संबंधित नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.


# रिसोडात दलाल सक्रिय, बांधकाम कामगार विभाग निष्क्रिय?

## ओळख ना, पाळख, दोन हजार द्या, अन् प्रमाणपत्र घ्या!


●प्रभाकर नाईकवाडे @रिसोड●

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली रिसोड तालुक्यात काही एजंट व दलाल सक्रिय झाल्याची चर्चा आहे. 'दोन हजार रुपये द्या आणि बांधकाम कामगार प्रमाणपत्र मिळवा,' अशा प्रकारे कामगारांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे आरोप होत आहेत.**

तसेच शैक्षणिक साहाय्य (एज्युकेशन क्लेम) मंजूर करून देण्यासाठी ३० टक्के कमिशनची मागणी केली जात असल्याची तक्रारही समोर येत आहे. यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेल्या अनेक कामगारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शासनाकडून विविध योजनांद्वारे आर्थिक मदत दिली जाते. मात्र, काही दलालांकडून या योजनांच्या नावाखाली कमिशन घेऊन लाभ मिळवून देण्याचे प्रकार



सुरू असल्याचा आरोप आहे. त्यामुळे खऱ्या



गाव :
वार :
वेळ :
ठिकाण :

गावातील सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, ज्या लोकांना भांडेवाल्या योजनेचे म्हणजेच पेटीवाल्या योजनेचे नवीन फार्म, रिन्हीवल व स्कॉलरशीपचे फार्म भरायचे असल्यास त्यांनी फार्म भरण्याकरीता ____ उपस्थित राहावे.

फार्म भारण्याकरीता लागणारी कागदपत्रे :
1) आपल्या कुटुंबातील सगळ्या सदस्यांच्या आधारकार्डची झेरॉक्स
2) राशनकार्डची झेरॉक्स
3) फोटो (ज्यांच्या नावाने बनवायचे आहे त्यांच्या) - 2 photo
4) MOB NO- OTP साठी.

वयमर्यादा : 18 वर्षच्या वर 60 वर्षाच्या आत.
नोट : हा फार्म पुरुष किंवा स्त्रीच्या नावाने भरता येतो.
स्कॉलरशिपसाठी मिळणारा अनुदान :

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 ली ते 7 वी साठी | :2500/- |
| 2) | 8 वी ते 10 वी साठी | :5000/- |
| 3) | 11 वी ते 12 वी साठी | :10,000/- |
| 4) | Graduation + Diploma | : 20,000/- |
| 5) | Post Graduation | : 25,000/- |
| 6) | Engineering | : 60,000/- |
| 7) | Medical | : 1,00,000/- |

कागदपत्रे देतांनी आपल्याला 200/- रु दयायचे आहेत आणि कामगार कार्डची पावती मिळाल्यानंतर 1500/- रु. दयायचे आहेत आणि तुमचे जे पण काम आहेत गॅरेन्टेड होतील.

नाव :
मोबाईल :

गरजू कामगारांना लाभ मिळण्यात अडचणी

### अर्धात तुम्ही, अर्धात आम्ही; तरचं लाभ मिळण्याची हमी! बांधकाम विभाग निकामी?

बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक अर्थसाहाय्य (एज्युकेशन क्लेम) योजनेत रिसोड तालुक्यात दलालांचे जाळे सक्रिय झाल्याची चर्चा आहे. मंजूर होणाऱ्या रकमेतून तब्बल ५० टक्के रक्कम कमिशन म्हणून मागितली जात असल्याचा आरोप कामगारांकडून होत आहे.

'अर्धात तुम्ही, अर्धात आम्ही; तरच लाभ मिळण्याची हमी,' असा फंडा काही एजंटांकडून राबविला जात असल्याचे सांगितले जात आहे. 'पैसे दिले तरच फाईल पुढे जाईल, अन्यथा त्रुटी काढून क्लेम प्रलंबित किंवा नामंजूर केला जाईल,' अशी भीती दाखवून गोरगरीब कामगारांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याची तक्रार आहे.दिवसभर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांना त्यांच्या हक्काच्या लाभासाठी दलालांचा आधार घ्यावा लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकाराकडे संबंधित बांधकाम कामगार विभाग दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी कामगार व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### दलालांच्या माध्यमातून बोगस ९० दिवसांचे प्रमाणपत्र देणाऱ्या कंत्राटदारांवरही कारवाई व्हावी!

बांधकाम कामगारांच्या विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली काही दलालांकडून दोन हजार रुपये घेऊन बोगस ९० दिवसांचे कामाचे प्रमाणपत्र दिले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अशा प्रकारे खोटी प्रमाणपत्रे देणाऱ्या दलालांसोबतच संबंधित कंत्राटदारांचीही विभागीय चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. खोट्या प्रमाणपत्रांमुळे खऱ्या पात्र कामगारांवर अन्याय होत असून शासनाची फसवणूकही होत आहे. त्यामुळे कामगार विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दलालांचे जाळे उघड करावे व संबंधित कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करावी, अशी जनतेची अपेक्षा आहे.

निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकाराकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना कामगारांमध्ये असून, कर्मचारी व दलाल यांच्यात साटेलोटे असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळेच हे एजंट शासकीय कार्यालय परिसरात आणि तालुक्यात उघडपणे फिरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी कामगार व नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या योजनांमध्ये दलालांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### रोजगार, बेरोजगारी व असंघटित उद्योग क्षेत्राची माहिती संकलित करण्यासाठी वाशिममध्ये दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणांना प्रारंभ!



●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने राबविण्यात येणारे नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण (इथ्इए) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग-आस्थापनांचे वार्षिक सर्वेक्षण (एळएं) ही दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येणार आहेत. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत ही सर्वेक्षणे केली जात आहेत.

राज्यातील जिल्हानिहाय अचूक व विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध व्हावी, हा या सर्वेक्षणांचा प्रमुख उद्देश आहे. नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षणाद्वारे रोजगार, बेरोजगारी, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार तसेच असंघटित रोजगार क्षेत्रासंदर्भातील अद्ययावत माहिती प्राप्त होणार आहे.

उद्योग-आस्थापनांची संख्या, उपलब्ध रोजगाराचे प्रकार, कार्यरत कामगारांची संख्या, प्रति कामगार व प्रति आस्थापना स्थूल मूल्यवर्धन, उत्पादकता तसेच वेतन यांसारख्या महत्त्वपूर्ण निर्देशांकांची माहिती संकलित केली जाणार आहे. बांधकाम क्षेत्र या सर्वेक्षणातून वगळण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या आकडेवारीचा उपयोग शासनाकडून विविध विकासात्मक योजना व धोरणे तयार करताना केला जाणार आहे.

या सर्वेक्षणांच्या कार्यारंभाचा शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अनिल बी. रेठे, उपायुक्त, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, वाशिम, कार्यालयातील कर्मचारी तसेच इप्सॉस रिसर्च प्रा. लि. चे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी जिल्ह्यातील नागरिकांना सर्वेक्षणासाठी भेट देणाऱ्या अधिकृत कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे जिल्ह्याची अचूक सामाजिक व आर्थिक स्थिती शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### वाशीम शहरालगत असलेल्या रिसोड नाका, पुसद नाका, व अकोला नाका परिसरात एसटी बस थांबा प्रवासि निवारा शेड उभारण्यात यावे.

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

वाशीम शहरालगत असलेल्या रिसोड, नाका, पुसद नाका व अकोला नाका परिसरात एसटी बस थांबा प्रवासि निवारा शेड उभारण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी दि. १० जुन रोजी आगार व्यवस्थापक साहेब वाशिम यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की वाशिम शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून या ठिकाणी ग्रामीण भागातील प्रत्येक गावातून शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, जेष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने एसटी बसने प्रवास करतात. प्रवासि निवारा शेड नसल्याने प्रवाशांना विशेषत: महिला व बालकांना उघड्यावर उन्हात व पावसात एसटी बसची वाट पाहावी लागते अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी आगार व्यवस्थापक साहेब वाशिम यांना निवेदनाद्वारे दिली आहे. एसटी बस थांबा प्रवासि निवारा शेड उभारण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी केली आहे.

## ९०% पेक्षा जास्त निकाल; पण परीक्षा विद्यार्थ्यांची नव्हे, तर बियाण्यांची होती..!

### * घोटा येथील संगमेश्वर शेतकरी गटानेही शास्त्रीय शेतीचा मार्ग स्वीकारत उगवण क्षमता तपासणीचा पाया रचला...

● दिपक मापारी @ कवठा●

परीक्षेत चांगले गुण मिळाल्यावर जो आनंद होतो, तसाच आनंद आज या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. कारण उगवण क्षमता चाचणीच्या निकालाने त्यांच्या पेरणीपूर्व तयारीवर शिक्कामोर्तब केले होते.

'फार्मर कप २०२६' अंतर्गत



महाराष्ट्रातील हजारो शेतकरी गट पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी करत आहेत. ही साधी पण अत्यंत



महत्त्वाची प्रक्रिया शेतकऱ्यांना बियाण्यांपैकी किती टक्के बियाणे





प्रत्यक्ष उगवतील याचा अंदाज देते. त्यामुळे पेरणीचे अचूक नियोजन करता येते, बियाण्यांची गरज योग्यरीत्या ठरवता येते आणि दुबार पेरणीमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येवू शकते. वाशिम जिल्ह्याच्या रिसोड तालुक्यातील घोटा गावच्या संगमेश्वर शेतकरी गटानेही शास्त्रीय शेतीचा मार्ग स्वीकारत उगवण क्षमता तपासणीद्वारे यशस्वी हंगामाचा भक्कम पाया रचला आहे.

## ऑनलाईन अर्ज सर्वांकडून, लाभ मात्र निवडकांना कृषी विभागाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह?

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

कृषी विभागामार्फत राबविण्यात आलेल्या मोफत बियाणे वाटप योजनेत महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात आल्याने अनेक पुरुष शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांना प्राधान्य देणे ही निश्चितच स्वागतार्ह बाब असली, तरी संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि पूर्वनियोजनाचा अभाव असल्याची भावना ग्रामीण भागातून घोटा येथून व्यक्त होत आहे.

योजनेंतर्गत हजारो शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केले. कृषी विभागाच्या आवाहनानुसार महिला आणि पुरुष अशा सर्वच शेतकऱ्यांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण केली. अनेक शेतकऱ्यांना यासाठी सी.एससी केंद्रावर जाऊन अर्ज भरावे लागले. काहींना तासनतास रांगेत उभे राहावे लागले, तर काहींनी कामधंदा सोडून अर्ज प्रक्रिया पूर्ण केली. अर्जासाठी शुल्क, प्रवास खर्च आणि दिवसाची मजुरी या चाही आर्थिक फटका अनेकांना बसला. मात्र प्रत्यक्ष लाभार्थी निवडीच्या वेळी महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे पुरुष शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेली, तर पुरुष शेतकऱ्यांकडून अर्ज का भरून घेण्यात आले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## गो आधारित नैसर्गिक शेतीचीच गरज – माजी खा. अनंतराव देशमुख

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

बदलते हवामान, मृदेचे खालावत चाललेले आरोग्य, वाढता उत्पादन खर्च आणि पिकांच्या उत्पादकतेत होत असलेली घट या पार्श्वभूमीवर गोआधारित नैसर्गिक शेती ही काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन सुविदे फाउंडेशन संचलित कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे अध्यक्ष तथा माजी खासदार अनंतराव देशमुख यांनी केले.

याशिवाय गुजरात राज्याचे कृषी





व पशुसंवर्धन मंत्री मा. श्री. जितुभाई वाघाणी यांच्या हस्ते गोआधारित नैसर्गिक शेती यशस्वीपणे राबविणाऱ्या वाशिम जिल्ह्यातील १७ प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. देशमुख पुढे म्हणाले की, गोकृपा अमृतमधील उपयुक्त सूक्ष्मजीव, अन्नद्रव्य विरघळविणारे जीवाणू, जैविक कीड व रोग व्यवस्थापनास सहाय्यक सूक्ष्मजीव तसेच उत्तम प्रतीच्या कुजलेल्या शेणखताचा वापर यामुळे मृदास्वास्थ्य सुधारते, पिकांची वाढ जोमदार होते आणि दीर्घकालीन उत्पादनक्षमता टिकून राहते. त्यामुळे कमी खर्चात निरोगी, गुणवत्तापूर्ण आणि पर्यावरणपूरक उत्पादन घेणे शक्य होत आहे. हवामान बदल, एल-निनो सारख्या प्रतिकूल परिस्थिती आणि वाढत्या कृषी खर्चाच्या पार्श्वभूमीवर गोआधारित नैसर्गिक शेती ही केवळ पर्यायी नव्हे तर भविष्यातील शाश्वत आणि आत्मनिर्भर कृषी व्यवस्थेची मजबूत पायाभरणी ठरू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# शिरपूरचा सूत्रधार, केनवडात चालवतो, गुटख्याचा काळाबाजार?




## मुंढेंची दहशत भारी; केनवडात बंद हॉटेल, डेअरी आणि पानटपरी !...

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

**अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईची चर्चा राज्यभर सुरू असताना, मेहकर-मालेगाव महामार्गावरील केनवडसह परिसरातही त्याचे पडसाद उमटताना दिसत आहेत. कारवाईच्या धास्तीने अनेक हॉटेल, दूध डेअरी, पानटपऱ्या व खाद्यपदार्थ विक्रीची आस्थापने काही काळासाठी बंद ठेवण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.**

भेसळयुक्त अन्नपदार्थ, दूषित दूध, प्रतिबंधित गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर धडक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेमुळे



नियमांचे पालन न करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले असून, केनवड परिसरातील काही व्यावसायिकांनीही खबरदारीचा उपाय म्हणून दुकाने बंद ठेवणे किंवा व्यवसायाची वेळ कमी करणे पसंत केल्याचे दिसून येत आहे.नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश प्रशासनाकडून देण्यात येत आहे. त्यामुळे अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या सर्व व्यावसायिकांनी स्वच्छता, गुणवत्ता व शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, केनवड परिसरात अन्न व औषध प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत कारवाई झाल्याची माहिती समोर आलेली नसली, तरी राज्यभर सुरू असलेल्या कारवायांमुळे व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र आहे. नागरिक मात्र अशा मोहिमांचे स्वागत करत असून, भेसळमुक्त व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, अशी मागणी करीत आहेत.

### बोगस गुटख्याचे शिरपूर कनेक्शन, केनवड कलेक्शन!...

केनवडसह परिसरात खुलेआम बोगस गुटख्याची विक्री सुरू असल्याची चर्चा असून, या अवैध व्यवसायाचे कनेक्शन शिरपूरपर्यंत पोहोचल्याची माहिती समोर येत आहे. केनवड हे गुटखा साठवण व कलेक्शनचे केंद्रबिंदू बनल्याचा आरोप होत असून, येथूनच परिसरातील विविध भागात पुरवठा केला जात असल्याचे बोलले जात आहे.या संपूर्ण प्रकरणाकडे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी लक्ष देऊन सखोल चौकशी करावी, तसेच संबंधित टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास या अवैध साखळीचा मोठा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. १६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## धनादेश अनादर; कारावासाची शिक्षा

**खामगाव:** खामगाव निधी लिमिटेड कडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला ७२ हजार रुपयांचा धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी न्यायालयाने कर्जदार कृष्णा गोपाल गवळी यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची व १० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. कृष्णा गोपाल गवळी यांनी व्यवसायासाठी खामगाव निधी लिमिटेडकडून कर्ज घेतले होते. कर्जफेडीसाठी त्यांनी बँक ऑफ बडोदाच्या खात्यावरील ७२ हजार रुपयांचा धनादेश संस्थेला दिला होता. मात्र खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने संबंधित धनादेश बँकेकडून अनादरित करण्यात आला.

त्यानंतर संस्थेने ॲड. जयंत पाटील यांच्यामार्फत कलम १३८ अंतर्गत कायदेशीर नोटीस बजावली. नोटीस मिळूनही थकीत रकमेची परतफेड न झाल्याने न्यायालयात दावा दाखल करण्यात आला. या प्रकरणाची सुनावणी न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रमांक ३, खामगाव येथे झाली

# खामगाव शहरात अतिक्रमणांवर धडक कारवाई; मुख्य मार्ग मोकळा !

### बसस्थानक - जी. एस. कॉलेज मार्गावरील अतिक्रमणे हटवली: वाहतूक कोंडीवर प्रशासनाची कारवाई!

प्रतिनिधी १६ जून

**खामगाव:** शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन खामगाव पालिकेने सोमवारी पहाटे मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणांवर धडक कारवाई केली. बसस्थानक-जी. एस. कॉलेज या अत्यंत वर्दळीच्या मार्गावरील अतिक्रमणे हटवून रस्ता मोकळा करण्यात आला.



नगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने सकाळी लवकर मोहीम सुरू केली. रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या शेड, जाहिरात फलक, हातगाड्या तसेच पादचारी मार्गावर अडथळा निर्माण करणारे विविध साहित्य हटवण्यात आले. बसस्थानक ते जी. एस. कॉलेज हा शहरातील प्रमुख वाहतूक मार्ग मानला जातो. अतिक्रमणांमुळे या मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत होती. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने कठोर भूमिका घेत विशेष मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरातील प्रमुख रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**इतर मार्गावरही कारवाईची मागणी**

मुख्य रस्ता मोकळा झाल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शहरातील इतर प्रमुख मार्गावरील अतिक्रमणेही हटवावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नियमित कारवाईमुळे वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होईल, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

**काहींनी स्वतः हटविले अतिक्रमण!**

नगरपरिषदेच्या अतिक्रमण निर्मूलन मोहिमेपूर्वी संबंधित व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या. प्रशासनाच्या सूचनांना प्रतिसाद देत काही व्यावसायिकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेत सहकार्याची भूमिका घेतली; मात्र नोटीसकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर नगरपरिषदेच्या पथकाने यंत्रसामग्रीच्या सहाय्याने कारवाई केली.

**नगरपरिषदेच्या कारवाईविरोधात रोष; दुजाभावाचा आरोप**

मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईनंतर काही व्यावसायिक आणि नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. शहरातील केवळ निवडक भागांमध्येच कारवाई करण्यात येत असून, इतर ठिकाणच्या अतिक्रमणां कडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला. आता त्यावरही पालिकेकडून कारवाई होते की नाही, याकडे लक्ष लागले आहे.

**नोटीसकडे दुर्लक्ष महागात!**

अतिक्रमणकर्त्यांना यापूर्वी अनेकदा नोटीस देऊन अतिक्रमणे स्वखर्चाने हटवण्याचे आवाहन करण्यात आले होते; मात्र त्याला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने नगरपालिकेला प्रत्यक्ष कारवाईचा मार्ग स्वीकारावा लागला. भविष्यात कोणतीही पूर्वसूचना न देता कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## खतांचा काळाबाजार करणाऱ्यांवर कृषी विभागाची करडी नजर !

### पथकांकडून कृषी केंद्रांची नियमित तपासणी!

प्रतिनिधी १६ जून

**खामगाव :** या वर्षीच्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य खत टंचाईची शक्यता लक्षात घेता, खतांचा काळाबाजार करणाऱ्यांवर कृषी विभागाने करडी नजर ठेवली आहे. जिल्ह्यातील कृषी केंद्रांवर नियमित तपासणी करण्यासाठी विशेष पथके नेमण्यात आली असून, ही पथके सातत्याने बाजारपेठेतील व्यवहारांवर लक्ष ठेवत आहेत.

खतांचा काळाबाजार किंवा चढ्या दराने विक्री होऊ नये, यासाठी कृषी विभागाने ही पावले उचलली आहेत. कृषी केंद्रांमध्ये साठा, विक्री दर आणि परवाना अटींची तपासणी केली जात आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कुठेही खतांचा काळाबाजार किंवा निर्धारित दरापेक्षा जास्त दराने विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास कृषी विभागाकडे तक्रार करावी, तक्रारींची गंभीर दखल घेत कारवाई करण्यात येईल, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

**शेतकऱ्यांसाठी तक्रार यंत्रणा सक्रिय !**

खतांचा काळाबाजार किंवा चढ्या दराची विक्री आढळल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारी मिळाल्यानंतर तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

**माहिती पत्रकांचे प्रदर्शन**

खामगाव शहरातील कृषी केंद्रांवर कृषी विभागाच्या वतीने खत व बियाणे विक्रीसंदर्भातील नियम, तसेच तक्रार कशी करावी याबाबत माहिती देणारी माहितीपत्रके लावण्यात आली आहेत.

**तपासणी पथकांची मोहीम**

कृषी विभागाने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात विशेष तपासणी पथके कार्यान्वित केली आहेत. ही पथके कृषी केंद्रांना भेट देऊन खतांचा साठा, विक्री दर आणि नोंदींची तपासणी करत आहेत. अनियमितता आढळल्यास संबंधित दुकानांवर कारवाई केली जात आहे.

## हिंदूसूर्य महाराणा प्रताप यांच्या जयंती उत्सवात सहभागी व्हा!

### माजी आ. राणा दिलीपसिंह सानंदा यांचे आवाहन

प्रतिनिधी १६ जून



**खामगाव :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी तिथीनुसार ज्येष्ठ शुक्ल तृतीया म्हणजे बुधवार, १७ जून रोजी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी यांच्या ४८६ वी जयंती असुन महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती खामगांवच्या वतीने जयंतीनिमित्त अभिवादन, रक्तदानासह विविध विधायक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त आयोजित विविध विधायक कार्यक्रमांना खामगाव विधानसभा मतदार संघासह बुलढाणा जिल्हयातील सकल राजपुत समाज बांधवांनी व राणा प्रेमी जनतेने हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माजी आमदार राणा दिलीपसिंह सानंदा व महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती खामगांव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराणा प्रताप जयंतीदिनिमित्त बुधवारी सकाळी ८ वाजता समाजभूषण, शक्तीउपासक राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली व राजपुत समाजातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नांदुरा रोडवरील भारतरत्न स्व.राजीव गांधी उद्यानात हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी यांच्या पुतळयाचे पुजन करुन माल्यार्पण, अभिवादन व ध्वजवंदन कार्यक्रम संपन्न होणार आहे. तद्नंतर सकाळी १० वाजता खामगाव सामान्य रुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न होणार आहे. तसेच रुग्णांना फळ व बिस्कीटांचे वाटप करण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता लॉयन्स संस्कृती अन्नछत्र येथे सामान्य रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना भोजन वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ५ वाजता २५ लक्ष रुपये खर्चुन प्रभाग क्रं.३ मधील हिंदुसुर्य महाराणा प्रताप भवन येथे कॅम्पाऊंड वॉल बांधकामासह इतर अनुषंगिक विकास काम करणे तसेच सायंकाळी ५.३० वा.प्रभाग क्रं.७ मधील चांदमारी चौक येथे २५ लक्ष रुपये खर्च करुन संत रोहिदास महाराज व्यासपीठाचे बांधकामासह इतर अनुषंगिक विकास कामे करणे यासह इतर विविध विकास कामांचे भुमीपुजन पार पडणार आहे. तसेच सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत स्व.राजीव गांधी उद्यान येथे हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींचा तसेच १० वी व १२ वी मधील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा त्यांच्या पाल्यासह सत्कार, दिव्यांग महिला भगिणींना साडी वाटप, दिव्यांग बांधवांना तीन चाकी सायकल वाटप तसेच फटाक्यांची भव्य आतिषबाजी करण्यात येणार आहे. अश्या विविध विधायक कार्यक्रमांनी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी होणार असुन या सर्व कार्यक्रमांना खामगाव विधानसभा मतदार संघासह बुलढाणा जिल्हयातील सकल राजपुत समाज बांधवांनी व राणा प्रेमी जनतेने आपल्या परिवारासह डोक्यावर केसरी फेटा बांधुन महाराणाजींचा जय-जयकार करीत हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माजी आमदार राणा दिलीपसिंह सानंदा व महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती खामगांवसह विविध राजपुत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. बुधवारी सायंकाळी ५ वाजता महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त राणा व्यायाम मंदिर दालफैल येथुन हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात येणार असून या शोभायात्रेचा स्व.राजीव गांधी उद्यान, नांदुरा रोड येथे समोराप होणार आहे.

## सिव्हिल लाइन परिसरात युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी १६ जून

**खामगाव:** शहरातील सिव्हिल लाईन परिसरातील केलानगर येथे एका ३२ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवार, १५ जून रोजी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हर्षल बाळकृष्ण कराळे (वय ३२) असे मृत युवकाचे नाव आहे. रविवारी रात्री त्याने घरातील लोखंडी अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेच्या वेळी त्याचे आई-वडील देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. सोमवारी सकाळी शेजाऱ्यांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर त्यांनी तत्काळ खामगाव शहर पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह शवविच्छेदनासाठी खामगाव येथील सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. मृत युवकाच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगी आणि एक मुलगा असा आप्तपरिवार आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, या प्रकरणाचा पुढील तपास खामगाव शहर पोलिस करीत आहेत.

गेल्या काही दिवसांत आत्महत्यांच्या घटना वाढत असल्याने चिंता व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्र राज्य परिवहन कृती समितीच्या वतीने शेगांव आगारात घंटानाद आंदोलन

प्रतिनिधी १६ जून

**शेगांव:** १५ जून २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन कृती समितीच्या नेतृत्वाखाली आज शेगांव आगार येथे विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी घंटानाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये आगारातील कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच एसटी कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या कामगारविरोधी धोरणांवर नाराजी व्यक्त करत, एसटी कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय होत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे यावेळी सांगण्यात आले.




आंदोलनादरम्यान उपस्थित कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे विविध घोषणा देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

'कृती समिती जिंदाबाद!'
'घेतल्याशिवाय राहत नाही!'
'एसटीआमच्या घामाची, नाही कुणाच्या बापाची!'
'एसटी कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत!'

अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. कृती समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न केवळ आर्थिक नसून त्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि भविष्याशी संबंधित आहेत. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाने संवेदनशील भूमिका घेत तातडीने योग्य निर्णय घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. शेगांव आगारात झालेल्या या आंदोलनात सर्व संघटनांचे पदाधिकारी आणि कर्मचारी एकत्र येऊन 'एकजूट हीच ताकद' हा संदेश दिला. घंटानाद करून शासनाला जागे करण्याचा हा प्रतीकात्मक प्रयत्न असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित सर्वांनी भविष्यातही कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी एकदिलाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने सकारात्मक प्रतिसाद न दिल्यास पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. एसटी कर्मचारी हा महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असतो. त्यामुळे त्याच्या न्याय्य मागण्यांचा सन्मान होणे, ही काळाची गरज आहे. शेगांव आगारातील आजचे घंटानाद आंदोलन हे त्याच संघर्षाचे एक प्रभावी प्रतीक ठरले.

महाराष्ट्र राज्य कृती समितीचा विजय असो. आज शेगाव आगारामध्ये एसटी कामगारांच्या आर्थिक प्रलंबित मागण्यांकरिता घंटा नाद आंदोलन करण्यात आले या आंदोलनामध्ये महेश बुरुंगले, अमोल राठोड, भास्कर गीते, दीपक चिकटे, नरेंद्र खंडेराव, अमोल गावंडे, राजेश बिटोळे, मारोती नागे, प्रफुल चव्हाण, जमीर देशमुख, वैभव पाठक, सुगधनंद इंगळे, मंगेश उईके श्रीकृष्ण बुटे, शेषराव निंबाळकर, वसीम राजा, सुभाष बहाकर, राजाराम माळी, संतोष दिवनाले, शेख रियाजुद्दीन, प्रकाश परीहार, प्रमोद बुंदे, अमोल पूर्णये तसेच महिला कर्मचारी शितल लाखे, दर्शना भावरकर, सत्यभामा सदार, रूपाली ताथोड व इतर महिला कर्मचारी घंटानाद आंदोलनात उपस्थित होते.

## चोरीच्या उद्देशाने एटीएम फोडण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी १६ जून

**मलकापुर:** तालुक्यातील धानोरा (विटाळी )येथील महाराष्ट्र बँकेच्या एटीएममध्ये घुसून एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या अज्ञात दोन इसमांविरुद्ध मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना रविवारी (दि. १५ जून) पहाटे ३.३६ ते ३.३८ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत बँक व्यवस्थापक महेश कैलास बुरसे (वय २९, व्यवसाय नोकरी, रा. पुसेगाव, ता. सेनगाव, जि. हिंगोली, सध्या रा. गजानन नगरी, मलकापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात दोन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (ऍ्ए) कलम ३०५ (इ), ३२४ (३) व ६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात दोन इसमांनी तोंडाला रुमाल बांधून हातात लोखंडी रॉड घेऊन धानोरा (विटाळी )येथील महाराष्ट्र बँकेच्या एटीएम केंद्रात प्रवेश केला. त्यानंतर एटीएम मशीन फोडून त्यातील रक्कम चोरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला. दरम्यान आरोपींनी एटीएम मशीनचे नुकसान केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी दाखल झालेल्या तोंडी अहवालावरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास ग्रामीण पोलीस निरीक्षक सतीश महल्ले यांच्या आदेशानुसार बिट पोलीस हेड कॉन्स्टेबल रघुनाथ जाधव करीत आहेत. दरम्यान, एटीएम केंद्रांवरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

## श्यामल नगरातील महिलांचे उद्या घागर आंदोलन

प्रतिनिधी १६ जून

**खामगाव:** खामगाव ग्रामीण ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या श्यामल नगर परिसरात तीव्र पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, नियमित्त पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. दहा ते बारा दिवसांपर्यंत नळांना पाणी न आल्याने महिलांसह संतप्त नागरिकांनी गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यास १७ जून रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर घागर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

श्यामल नगर परिसरात मोठ्या संख्येने शासकीय व निमशासकीय कर्मचारी, निवृत्त कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय वास्तव्यास आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक कुटुंबांना दहा-बारा दिवसांनंतरही नळाचे पाणी मिळत नसल्याने त्यांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे आर्थिक भार बाढला असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे हाल होत आहेत. परिसरात पुरेशा प्रमाणात जलस्त्रोत उपलब्ध असतानाही ग्रामपंचायतीच्या नियोजनाच्या अभावामुळे आणि दुर्लक्षामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यापूर्वीही ग्रामपंचायत प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी व पाठपुरावा करण्यात आला. मात्र समस्या कायम असल्याने नागरिकांचा संयम अखेर संपला आहे. गटविकास अधिकाऱ्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात नियमित, सुरळीत व कायमस्वरूपी पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागणीची

दखल न घेतल्यास १७ जून रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती कार्यालयासमोर महिलांसह नागरिक घागर आंदोलन करतील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस संबंधित प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर सुवर्णा हिवराळे, शालीग्राम मानकर, राजू राऊत, प्रभा सारोळकार, शारदा राऊत, नंदा तोंडे, निर्मला धानोरे, वंदना सार्वग, सुकेशनी वानखडे, मिरा गवळी, लता ठाकरे, वर्षा नेमाने, उषा सोळंके, प्रतिभा बावस्कार, अभिजीत आसोडे, रंजना चव्हाण, सविता शेगोकार, रुपाली वाकोडे, अमोल कांबळे यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अधिकारी शाळा दत्तक घेणार; विद्यार्थ्यांना सुविधा पुरवणार!

### पटसंख्या वाढवण्यासाठी शिक्षण विभागाचा निर्णय !

प्रतिनिधी १६ जून

**खामगाव:** जिल्ह्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि घटती पटसंख्या रोखण्यासाठी शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता शिक्षण विभागातील वर्ग १ आणि वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना जिल्ह्यातील शाळा दत्तक घ्याव्या लागणार आहेत. या दत्तक योजनेच्या माध्यमातून शाळांमध्ये भौतिक सुविधांचा विस्तार करणे, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे आणि पटसंख्या वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या योजनेंतर्गत दत्तक घेतलेल्या शाळांना अधिकाऱ्यांना वर्षभरात वेळोवेळी भेटी द्याव्या लागणार असून, तेथील शैक्षणिक व भौतिक स्थितीचा आढावा घेऊन शिक्षकांना मार्गदर्शन करावे लागणार आहे. बुलढाणा जिल्ह्यात सद्यस्थितीत जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये साधारण सव्वालाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रामुख्याने दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील गरीब, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी या शाळा हाच शिक्षणाचा एकमेव आधार आहेत.

**वेळोवेळी शाळांना भेटी द्याव्या लागणार!**

केवळ कागदावर शाळा दत्तक घेऊन चालणार नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांना वर्षभरात वेळोवेळी या शाळांना प्रत्यक्ष भेटी द्याव्या लागतील. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांची वाचन, लेखन व गणितीय गुणवत्ता तपासणे, शिक्षकांच्या अडचणी समजून घेणे आणि शालेय व्यवस्थापन समितीशी संवाद साधून प्रत्यक्ष मैदानावर काम करावे लागणार आहे.

**पाच वर्षांत जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या घटली!**

गेल्या पाच वर्षातील आकडेवारीवर नजर टाकल्यास, जिल्हा परिषद आणि स्थानिक संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या लक्षणीयरीत्या घटल्याचे समोर आले आहे. इंग्रजी माध्यमांचे आकर्षण, सुविधांचा अभाव आणि पालकांचा खासगी शाळांकडे वाढलेला ओढा यामुळे सरकारी शाळांमधील पटसंख्या रोडावत चालली आहे. ही घसरण थांबवणे हे प्रशासनासमोर आव्हान आहे.

दत्तक घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर केवळ देखरेखीची जबाबदारी नसेल, तर संबंधित शाळेत नवीन शैक्षणिक वर्षात पटसंख्या कशी वाढवता येईल, याचे उद्दिष्ट देखील दिले जाणार आहे. परिसरातील एकही बालक शिक्षणापासून वंचित राहणार नाही आणि गळतीचे प्रमाण शून्य होईल, यावर अधिकाऱ्यांना काम करावे लागेल, हे विशेष.

**विविध कृती कार्यक्रम**

शाळांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी वर्षभर विविध कृती कार्यक्रम राबवले जाणार आहेत. यामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्रांतर्गत विविध उपक्रम, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यासारख्या उपक्रमांचे नियोजन केले जाईल.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. १६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# तापडिया नगर परिसरात पेट्रोल चोर सक्रिय, दोन चोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

प्रतिनिधी १६ जून

**अकोला :** पेट्रोल महाग झाल्यामुळे रात्रीच्या वेळी लोकांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या मोटारसायकलमधून पेट्रोल चोरण्याच्या घटनांमध्ये आजकाल कमालीची वाढ झाली आहे. पेट्रोल चोरीच्या या घटनांमध्ये अशा अनेक तरुणांचा समावेश आहे, जे आपले शोक पूर्ण करण्यासाठी आणि रुबाब मारण्यासाठी मोटारसायकल चालवण्याकरिता पेट्रोलची चोरी करत आहेत. अशीच एक घटना तापडिया नगर परिसरातील 'स्नेह सागर अपार्टमेंट'च्या पार्किंगमध्ये घडली. मध्यरात्री पार्किंगमध्ये प्रवेश करून हे दोन तरुण प्लास्टिकच्या बाटलीत तेथे उभ्या असलेल्या वाहनांमधून पेट्रोल चोरताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. त्यापैकी एकाने आपले तोंड कापडाने झाकले होते, तर दुसरा उघडपणे मोटारसायकलचे कॉक उघडून बाटलीत पेट्रोल भरत होता.

परिसरात पोलिसांची गस्त नसल्यामुळे अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. अपार्टमेंटमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असूनही हे दोन्ही चोर निर्धास्तपणे पेट्रोल चोरत आहेत, ही मोठी चिंतेची बाब आहे. अशा पेट्रोल चोरांमुळे लोकांची रात्रीची झोप उडाली आहे. नागरिक सकाळी टाकी फुल करतात आणि रात्रीच्या वेळी हे पेट्रोल चोर ती टाकी रिकामी करून जातात. हे सर्व पाहता, पोलिसांनी या पेट्रोल चोरांना पकडून त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.







# तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे सोमवती अमावस्या निमित्त भाविकांचा उसळला जनसागर



प्रतिनिधी १६ जून

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर व दर्यापूर तालुक्याच्या सीमेवरील पूर्णा नदी तीरावर अधिक मास समाप्तीच्या शुभ-परवावर आलेल्या सोमवती अमावस्या निमित्त तीर्थक्षेत्र लाखपुरी ता. मूर्तिजापूर जि. अकोला येथे पूर्णा नदी तीरावर तसेच श्री भगवान लक्षेश्वर मंदिरात पश्चिम विदर्भातून भाविकांची प्रचंड गर्दी झाली.

पितृदोष तसेच आपल्या पूर्वजांना मिळवण्याच्या विधी साठी तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे पूर्णा नदी तीरावर विशेष महत्त्व असल्यामुळे सोमवारी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली . भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन श्री लक्षेश्वर संस्थानच्या युवा सेवाधारी ,पुरुष व महिला सेवाधाऱ्यांनी विविध उपाय योजना केल्या होत्या . पूर्णा नदी तीरावर पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी टँकरद्वारे शुद्ध पाण्याची व्यवस्था , मंदिर परिसरात वाहन पार्किंग व्यवस्था , श्री लक्षेश्वर मंदिरात शुद्ध थंड पाणी , सुवासिक मसालेभात महाप्रसाद व्यवस्था , मंडप इत्यादी व्यवस्था भाविकांसाठी करण्यात आली होती . यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले . सोमवारी सकाळी ५ वाजता पासुन रात्री १० वाजेपर्यंत श्री लक्षेश्वर मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होती . नदी परिसरात विविध विधी करिता ब्राह्मण , नाभिक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते . यावेळी मुर्तीजापुर ग्रामीण पोलीस स्टेशन चोख बंदोबस्त होता अशी माहिती श्री लक्षेश्वर संस्थांच्या वतीने देण्यात आली आहे .

# अकोटचा पाणीपुरवठा विस्कळीत

वि.प्रतिनिधी १६ जून

**अकोट :** शहराला वान धरणातून पाणीपुरवठा केला जातो. तसेच ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ग्रामीण भागालाही पाणी दिले जाते. धरणातून आणलेले पाणी जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून विविध टाक्यांमध्ये साठवले जाते व त्यानंतर नळाद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचवले जाते. मात्र, शहरातील काही भागांमध्ये पाणीपुरवठा वेळेवर होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सरस्वती नगर परिसरातील राधे-राधे कॉलनीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या कायम आहे. या भागातील नागरिकांना अनेकदा रात्री एक वाजल्यानंतर पाणी मिळते. त्यामुळे पाणी भरण्यासाठी नागरिकांना मध्यरात्रीपर्यंत जागरण करावे लागते. या समस्येच्या निराकरणासाठी सरस्वती शाळेजवळ पाईपलाईन जोडून वाल बसवण्यात आला अतिरिक्त व्यवस्था उभारण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात वारंवार व दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित होत असल्याने जलशुद्धीकरण केंद्र व पाणी उपसा प्रक्रियेवर परिणाम होत आहे. परिणामी अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून राधे-राधे कॉलनीतील नागरिकांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा रात्रभर पाण्याची प्रतीक्षा करूनही नळांना पाणी येत नाही. त्यामुळे घरगुती वापरासाठी आवश्यक पाण्याची मोठी समस्या निर्माण होत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येवर तातडीने लक्ष देऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तसेच राधे-राधे कॉलनीसह सरस्वती नगर परिसरातील नागरिकांना वेळेत आणि नियमित पाणी मिळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समिती ते राजकमल टॉकीज चौक रस्त्याचे काम रखडले

प्रतिनिधी १६ जून

**♦ येणाऱ्या जाणाऱ्यांना दररोज त्रास, नागरिक त्रासले**



**अकोला :** मागील पाच महिन्यापासून भूमिगत गटार योजनेच्या नावाखाली कृषी उत्पन्न बाजार समिती ते राजकमल टॉकिज चौक रस्ता खोदून ठेवला आहे.

दररोजच्या त्रासाला नागरिक कंटाळले आहे. पाऊस सुरू होणार असल्याने त्यापूर्वी काम व्हावे अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे या रस्त्याचे उद्घाटन करूनही दीड महिने उलटले असूनही ह्या रस्त्यावर अद्याप कुठलेही काम सुरू झाले नाही. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकां सोबतच कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आपला शेतमाल घेऊन येत असलेल्या शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. लोकांना अडचणीच्या वेळी गवळीपुरा भागातून जाण्याशिवाय पर्याय राहत नाही. याकडे देखील लक्ष वेधले जात आहे.

# भूमिगत गटार योजना अंतर्गत लावण्यात आलेली जाळी चोरी, दोन संशयीतांना अटक



प्रतिनिधी १६ जून

**अकोला :** महानरपालिका पश्चिम झोन अंतर्गत गुलजार पुरा स्मशानभूमी मागील भागात मोर्णा नदीच्या काठावर भूमिगत गटार योजने अंतर्गत नाल्या जोडणीकरिता बंधारा बांधण्यात आला असून त्यावर लोखंडी जाळ्या टाकण्यात आल्या होत्या. १२ जून रोजी देखभाल दुरूस्तीचे काम सुरू असतांना त्यापैकी ३० हजार रुपये किमतीची १ जाळी अज्ञात चोरट्यानी चोरून नेली होती. पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली आहे.

जाळी सांडपाणी व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्वाची असल्यामुळे १५ जून रोजी डाबकी रोड पोलिस स्टेशनला लेखी तक्रार करण्यात आली होती. या घटनेची पोलिस प्रशासनाने दखल घेत अवघ्या दोन तासात २ संशयीतांना अटक केली असल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. यामुळे भविष्यात महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या व्यक्तींवर अशाच प्रकारची कार्यवाही होणार आहे.

# अमरावतीत वाईन ॲण्ड बियर शॉपीवर कारवाई



प्रतिनिधी १६ जून

**अमरावती :** दारुपिणाऱ्या ला जागा उपलब्ध करुन देण्याऱ्या वाईन ॲण्ड बिअर शॉपीवर राजापेठ पोलिसांनी धडक कारवाई केली आहे.

पोलीस स्टेशन राजापेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन राजापेठ हददीत गुन्हेगार चेंकींग तसेच हॉटेल, ढाबे, पानठेल्यावर दारु पिण्यास जागा व साहित्य उपलब्ध करुन देण्याऱ्यांवर धडक कारवाई करण्यात येत आहे. या अनुषंगाने पोउपनि मिलींद हिवरे व डिबी स्टाफ सह १५ जून रोजी पेट्रोलींग करीत असताना खात्रीलायक बातमी मिळाली की, शंकर नगर, रोडवरील लिकरीया बिअर ॲण्ड वाईन शॉपचा चालक व मालक विनोद केशवप्रसाद मालविया हा अवैध्यरित्या दारु पिण्याऱ्या लोकांना जागा उपलब्ध करुन देत आहे. यावरून लिकरीया बिअर ॲण्ड वाईन शॉपवर धाड टाकली असता एक इसम त्याचे दुकानामध्ये लोकांना बसवुन दारु पिण्याकरीता जागा व साहित्य उपलब्ध करीत असताना दिसुन आला. त्यामुळे वाईन शॉप चालकास ताब्यात घेतले. त्याचे नाव विनोद केशवप्रसाद मालवीया (४९) वर्षे, रा. शंकर नगर, अमरावती असे आहे. त्याच्याविरूध्द पो. स्टे. ला कलम ६८ महा. दारुबंदी कायदा अन्वये दाखल करण्यात आला. ही कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि- २ अमरावती, संजय खताळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, पोउपनि मिलींद हिवरे, पोहेकॉ मनीष करपे, पोहेका रवि लिखितकर, व पोका अर्जुन कदम, यांनी केली.

# विकमसी चौक - बाळापूर बायपास रस्त्यावरील पथदिवे पाच दिवसांपासून बंद; दुरुस्तीकडे दुर्लक्ष!

प्रतिनिधी १६ जून

**खामगाव :** विकमसी चौक ते बाळापूर बायपास रोड दरम्यान असलेले पथदिवे मागील पाच दिवसांपासून बंद अवस्थेत आहेत. त्यांची दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. पथदिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे वाहनचालक तसेच पादचारी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघाताची शक्यता वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या मार्गावर रात्रीच्या वेळी वाहनांची वर्दळ अधिक असते. मात्र, प्रकाश व्यवस्था बंद असल्याने वाहनचालकांना रस्त्यावरील खड्डे व अडथळे स्पष्ट दिसत नाहीत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी पथदिवे तातडीने दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, संबंधित विभागाने याकडे तात्काळ लक्ष देऊन पथदिव्यांची दुरुस्तीची मागणी होत आहे.










हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK